cmyk

## संपादकीय

### वैद्यकीय बोगसगिरी जीव घेतेय!

गेल्या काही काळापासून औषधांचा आणि बोगस डॉक्टरांचा, ज्यांना झोलाछाप डॉक्टरही म्हटले जाते त्यांचा विषय अत्यंत गंभीरपणे समोर येतो आहे. रुग्णाच्या आयुष्याशी हा विषय निगडीत असल्यामुळे केवळ राज्यांपुरतीच नाही तर केंद्रीय पातळीवर धडक मोहीम आणि धोरणाची आखणी करून हा धोका पूर्णत: नष्ट करणे आवश्यक असताना त्याकडे अद्याप म्हणावे तसे लक्षच दिले गेले नसल्याचे खेदाने म्हणावे लागते आहे. राजस्थानच्या भरतपूरमधील घटना धक्कादायक आहे. मुलाला सर्दी आणि खोकला असल्यामुळे सरकारी आरोग्य केंद्रात नेण्यात आले होते. डॉक्टरांनी औषधांसोबतच कफ सिरपही लिहून दिले. घरी आल्यावर मुलाच्या पालकांनी त्याला सिरप दिले.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com   नवी दिशा... नवे विचार.....   email:rajyaloktantra75@gmail.com


### अमित शाहांचा शिर्डी मुक्काम; अर्धा डझन मंत्रीही सोबत

शिर्डी: केंद्रीय सहकारमंत्री तथा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह ४ आणि ५ ऑक्टोबर रोजी अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून ४ ऑक्टोबर रोजी ते शिर्डीत मुक्कामी असून ५ ऑक्टोबर रोजी सकाळी साईबाबांच्या दर्शनाने आपल्या दौऱ्याला सुरुवात करणार आहे. अमित शाह शिर्डीत मुक्कामी असल्याने मुख्यमंत्री आणि अनेक मंत्री शिर्डीत मुक्कामी असून लोणी आणि कोपरगावच्या कार्यक्रमांना उपस्थिती लावण्यासाठी अर्धा डझन पेक्षा अधिक मंत्री शिर्डी दौऱ्यावर आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्या असून अमित शहांच्या शिर्डी मुक्कामामुळे अहिल्यानगर जिल्ह्यात महायुतीला बळ मिळणार असल्याची चर्चा रंगत आहे. तसेच जिल्ह्याच्या राजकारणातील दोन नेत्यांच्या पुनर्वसनाची चर्चाही रंगत आहे.


बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१५९ | रविवार, दि.०५ ऑक्टोबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


# अतिवृष्टीत मागणी हेक्टरी ५० हजारची पदरात फक्त अडीच हजार

पुणे । प्रतिनिधी

**राज्यात गेल्या १५ दिवसांपूर्वी झालेल्या पावसाने सर्वत्र पाणीच पाणी झाल्याचं पाहायला मिळालं. मराठवाड्यातील धाराशिव, लातूर, नांदेड, बीड, परभणी आणि सोलापूर जिल्ह्यात अनेक नद्यांना पूर आला होता. या पुराच्या पाण्यात शेतकऱ्यांची पिके पाण्यात गेली आहेत, तर काही ठिकाणी शेतातील मातीही वाहून गेली आहे.मे महिन्यातील अतिवृष्टीसाठी मदतीचे निधी वितरित होताना दिसत आहे मागणी हेक्टरी ५० हजार रुपयाची असताना केवळ अडीच हजार मदत दिली जात असल्याने शेतकऱ्यातून संताप व्यक्त केला जात आहे.**

राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री ▶▶ पान २ वर



### मे महिन्यातील अतिवृष्टीसाठी मदत

राज्यात फेब्रुवारी २०२५ ते मे २०२५ या कालावधीत ''अवकाळी पाऊस व गारपीट'' यामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी विभागीय आयुक्त यांचेकडून निधी मागणीचे प्रस्ताव शासनास प्राप्त झाले होते. त्याअनुषंगाने शासनाने मदतीचे पॅकेज देखील जाहीर केले होते शेतकऱ्यांना मदत देण्याकरिता शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या दरानुसार एकूण रुपये ३३७ कोटी ४१ लक्ष ५३ हजार इतका निधी वितरीत करण्यास शासनाची मंजूरी दिली होती.

### १९ लाख २२ हजार शेतकऱ्याचे नुकसान

दरम्यान, राज्यात जुलै व ऑगस्ट २०२५ या महिन्यात झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या १९ लाख २२ हजार ९०९ शेतकऱ्यांच्या १५ लाख ४५ हजार २५०.०५ हेक्टरवरील शेत पिकाच्या नुकसानीपोटी १३३९ कोटी ४९ लाख २५ हजाराच्या मदतीस मान्यता देण्यात आली आहे, अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी यापूर्वी दिली होती. शासनाकडून आता ती देखील मदत मिळण्यास सुरुवात झाली आहे.

# मुख्यमंत्र्यांसमोर छगन भुजबळ आक्रमक

## परवानगी न घेता हैदराबाद गॅझेटचा जीआर कसा काढला?

मुंबई । प्रतिनिधी

**मुख्यमंत्र्यांनी बोलावलेल्या ओबीसी समाजाच्या नेत्यांच्या बैठकीत छगन भुजबळ आक्रमक झाल्याचं दिसून आलं. विधी आणि न्याय विभागाची परवानगी न घेता हैदराबाद गॅझेटच्या संदर्भात तुम्ही शासन निर्णय कसा काढला असा प्रश्न भुजबळांनी विचारला. तसेच ओबीसी समाजासाठी असलेल्या महाज्योतीसाठी सरकारी निधी कधी उपलब्ध करून देणार असाही प्रश्न भुजबळांनी विचारला.**



मराठा आरक्षणाच्या हैदराबाद गॅझेटवरुन अनेक ओबीसी नेत्यांनी नाराजी व्यक्त केली. त्याविरोधात अनेक ठिकाणी मोर्चे निघाले. त्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांनी सकल ओबीसी ▶▶ पान २ वर

### श्वेतपत्रिका काढा, पंकजा मुंडेंची मागणी

मराठा समाजाला जे कुणबी प्रमाणपत्र दिले जात आहे त्यावर श्वेतपत्रिका काढा अशी मागणी भाजपच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी केली. तर हैदराबाद गॅझेटचा शासन निर्णय रद्द करा अशी मागणी विजय वडेट्टीवार यांनी मुख्यमंत्र्यांना केली. मंगेश ससाणे आणि प्रकाश अण्णा शेंडगे हे देखील या बैठकीत आक्रमक झाले होते आणि हैदराबाद गॅझेटचा शासन निर्णय रद्द करण्याची मागणी त्यांनी केली.

## आरक्षण आमच्या हक्काचे मुख्यमंत्र्यांनी भानगडीत पडू नये-मनोज जरांगे

मुंबई । प्रतिनिधी

मराठ्यांच्या आरक्षणाला कुठेही वेगळा फाटा दिला जाईल असे एकही पाऊल सरकारने आणि मुख्यमंत्र्यांनी उचलायचे नाही. आमचे आरक्षण हक्काचे आहे. बाकीच्या भानगडीत मुख्यमंत्र्यांनी पडू नये, एवढी आम्हाला मुख्यमंत्र्यांकडून अपेक्षा आहे.मराठ्यांचे आणि मराठ्यांच्या पोरांचे वाटोळे होईल असे एकही पाऊल आपण जातीयवादी नेत्यांचं ऐकून उचलू नये असे मनोज जरांगे पाटील म्हणाले.



वडेट्टीवार म्हणतायत, मराठा आरक्षणासाठी जो जीआर केलाय तो रद्द करण्याची आमची मागणी आहे. त्याचे कोण ऐकतंय बुगळ्याचं त्या. त्या लाल्याने सांगितलं असेल, कारण काँग्रेस मराठ्यांच्या विरोधात जास्त बोलतेय ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### अभिनेत्री संध्या शांताराम यांचे निधन

मुंबई : मराठी चित्रपटसृष्टीतील गाजलेला सिनेमा 'पिंजरा'मध्ये काम करणाऱ्या अभिनेत्री संध्या शांताराम यांचे निधन झाले आहे. वयाच्या ९७ व्या वर्षी त्यांचे निधन झाले आहे. शनिवारी ३ ऑक्टोबर रोजी संध्या यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनानंतर चित्रपटसृष्टीमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. अनेकजण सोशल मीडियाच्या माध्यमातून संध्या यांना श्रद्धांजली वाहताना दिसत आहेत.ज्येष्ठ अभिनेत्री संध्या शांताराम या व्ही. शांताराम यांच्या दुसऱ्या पत्नी होत्या. त्यांनी मराठीसह हिंदी सिनेमांमध्येही स्वत:ची अशी वेगळी ओळख निर्माण केली आहे.

### रायगडमध्ये शिवसेना राष्ट्रवादीत जुंपली

रायगड : जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसविरुद्ध शिंदेंच्या शिवसेना आमदारांमधील वाद काही केल्या कमी होताना दिसून येत नाही. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत रायगड जिल्ह्यात राष्ट्रवादीशी युती करणार नाही अशी घोषणा शिवसेना शिंदे गटाचे आमदार महेंद्र थोरवे यांनी केली. तसेच, खासदार सुनील तटकरे हे ठाकरे गटाला मदत करत असल्याचा आरोपही त्यांनी केला होता. त्यानंतर, आता रायगड जिल्ह्यातील महाडमधील शिवसेना आमदार महेंद्र दळवी यांच्या कार्यकर्त्यांनी महाडमधील राष्ट्रवादीचे नेते स्नेहल जगताप यांच्या सहकाऱ्याला दम दिल्याने राजकीय तणाव निर्माण झाला आहे.

### गिल कर्णधार, तर रोहित-विराटचं कमबॅक!

नवीदिल्ली : भारतीय संघ या महिन्यात ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहे, ज्यासाठी बीसीसीआयने संघाची घोषणा केली आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहली हे बऱ्याच काळानंतर पहिल्यांदाच खेळताना दिसणार आहे, पण शुभमन गिल कर्णधार असणार आहे. भारताचा वेस्ट इंडिजविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेनंतर आता ऑस्ट्रेलिया दौरा निश्चित झाला आहे. हा दौरा १९ ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबरदरम्यान पार पडणार असून यात भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात ३ एकदिवसीय आणि ५ टी-२० सामने खेळले जातील. बीसीसीआयने या मालिकेसाठी टीम इंडियाची घोषणा केली आहे.

### अनिल परब अर्धवट वकील-रामदास कदम

मुंबई : उद्धव ठाकरेंनी बाळासाहेबांचा मृतदेह दोन दिवस घरीच ठेवला, त्यांच्या हातचे ठसे घेतल्याचा आरोपावर आपण कायम असल्याचं शिवसेना शिंदे गटाचे नेते रामदास कदम म्हणाले. यावर उद्धव ठाकरे का बोलत नाहीत? त्यांचे चेलेचपाटे का बोलतात? अनिल परबांना 'मातोश्री'चा हिस्सा मिळाला आहे का असा प्रश्नही रामदास कदम यांनी विचारला. अनिल परबांनी रामदास कदमांवर आरोप केले होते. त्या आरोपांना रामदास कदमांनी उत्तर दिलं.रामदास कदम म्हणाले की, ''मला वाटतं अनिल परब हे अर्धवट वकील आहेत. त्यांनी पत्रकार परिषद घेऊन त्यांच्या अडाणीपणाचे प्रदर्शन केले.

### शिंदे सेनेचे नेते महेश चिवटेंवर हल्ला

सोलापूर : सोलापुरातील करमाळ्यातून एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. शिवसेना पंढरपूर विभाग जिल्हाप्रमुख (शिंदे गट) महेश चिवटे यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला आहे. हा हल्ला सकाळी झाला असल्याची माहिती आहे. हल्ला झाल्यानंतर पोलिस निरीक्षक रणजित माने घटनास्थळी दाखल झाले असून, घटनेचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, महेश चिवटे हे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे स्वीय सहाय्यक मंगेश चिवटे यांचे ज्येष्ठ बंधू असल्याची माहिती आहे.

### विमानतळावर आले अचानक १७ ड्रोन

म्युनिक : जर्मनीतील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे असलेले म्युनिक विमानतळ शुक्रवारी १७ ड्रोन दिसल्यामुळे बंद करण्यात आले. यासोबतच हे ड्रोन रशियाचे असल्याचाही दावा करण्यात आला. म्युनिक विमानतळ प्रशासनाच्या म्हणण्यानुसार, विमानतळ परिसरात ड्रोन दिसल्याने १७ विमान उड्डाणे रद्द करण्यात आली. हेच नाही तर म्युनिक विमानतळावर येणारी विमाने दुसऱ्या विमानतळावर उतरवण्यात आली.युक्रेन-रशिया युद्धात जगातील अनेक देशांनी उडी घेतल्याने हे युद्ध अधिकच पेटल्याचे बघायला मिळतंय.

## टोलचा नवा नियम

नवी दिल्ली । वृत्तसंस्था



टोल पेमेंट संदर्भात आणखी एक नवा नियम करण्यात आला आहे. डिजिटल पेमेंटला प्रोत्साहन देण्यासाठी आणि टोल नाक्यावर रोख रकमेत होणारे व्यवहार कमी करण्यासाठी नवा नियम केला गेला आहे. त्यानुसार राष्ट्रीय महामार्गावर फास्टॅग नसलेल्या कोणत्याही वाहनाच्या प्रवेशावेळी पेमेंटच्या आधारावर टोल घेतला जाईल. नितीन गडकरी यांच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयानं २००८ मधील नियमात बदल केले आहेत. त्यानुसार वाहन धारकांनी रोखीत पैसे दिल्यास त्यांना टोल टॅक्सच्या दुप्पट रक्कम भरावी लागेल. पण जर वाहन धारकांनी यूपीआय किंवा अन्य मार्गानं डिजिटल पेमेंट केल्यास हाच टॅक्स १.२५ पट असेल. सध्याच्या घडीला रोख आणि दोन्ही पद्धतींनी पेमेंट केल्यास दुप्पट कर घेतला जातो. पण आता यूपीआयच्या माध्यमातून पेमेंट केल्यास नॉन फास्टॅग यूजर्सना कमी टॅक्स द्यावा लागेल. फास्टॅग नसलेल्या वाहनांसाठी ही मोठी सूट आहे.

# लिंबारुईत दलित समाज बहिष्कृत?

## बौद्ध विहाराच्या जागेवर अचानक छत्रपती भवनाचा बोर्ड

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये असलेल्या लिंबारुई देवीचे या ठिकाणी मागील दोन महिन्यापूर्वी गावातील दलित समाजाने गायरान जमिनीवर धम्मज्योत बौद्ध विहार नावाचा बोर्ड लावून निळा झेंडा ही लावला होता मात्र मागील आठ दिवसापूर्वी रातोरात त्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज भवन असा बोर्ड लावून भगवा झेंडा लावल्याने गावात सामाजिक वातावरण दूषित बनले गेल्याचे दिसत आहे गावातील दलित समाजाने जिल्हाधिकारी कार्यालयात २९ सप्टेंबर रोजी रितसर निवेदन देखील दिले आहे. ▶▶ पान २ वर



### या जागेवर ३३ केव्ही उपकेंद्राला मंजूर

लिंबा रुई येथील ज्या जागेवरून वाद सुरू आहे ती गायरान जमीन असो याच गायरान जमिनीवर ३३ केवी उपकेंद्र मंजूर आहेत त्यामुळे तेथील जागाही कोणत्याही एका व्यक्तीची किंवा समाजाची नाही भविष्यात या ठिकाणी ३३ केवी केंद्रस उभारले जाण्याची शक्यता असल्याची माहिती आहे.

### सलोख्यासाठी प्रयत्न करू-पप्पू कागदे

या संदर्भात रिपाईचे जिल्हाध्यक्ष पप्पू कागदी यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले ही बाब माझ्या कानी आली आहे मी सध्या नागपूर येथे असून सोमवारी आल्यानंतर मी भेट घेऊन माझा निर्णय सांगेल शिवाय सामाजिक सलोखा कसा कायम राहील यासाठी मी प्रयत्न करेल.

### नाशिकमध्ये आदिवासी आंदोलनाला हिंसक वळण

नाशिक । प्रतिनिधी

**नाशिकच्या कळवण येथील आदिवासी आंदोलनाला हिंसक वळण लागले आहे. यात आंदोलकांनी पोलिस स्थानकावर दगडफेक केल्याची घटना घडली आहे. आदिवासी शेतमजुराचे अपहरण करून खून केल्याचा आरोप प्रकरणात संशयितांवर गुन्हा दाखल करण्यासाठी आंदोलन सुरू होते.**

या आंदोलनादरम्यान, पोलिस आणि आंदोलकांमध्ये झालेल्या शाब्दिक वादातून ही दगडफेक झाल्याचे बोलले जात आहे. अचानक जमावाकडून करण्यात आलेल्या दगडफेकीत पोलिस आणि पत्रकार जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. तर पोलिस वाहनाच्या काचाही फुटल्याचे बघायला मिळाले आहे. सध्या परिसरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात ▶▶ पान २ वर

# लंपट पोलीस निरीक्षकाला भर रस्त्यावर बदडले

बीड । प्रतिनिधी

**बीडमध्ये असताना एका विवाहितेला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. त्यानंतर धाराशिवला बदली झाली. पिस्तूलचा धाक दाखवून बलात्कार केला. त्यानंतर महिन्यापासून त्याच पीडितेवर पुन्हा प्रेम जडले. दोघेजण कारमधून फिरताना पतीने रंगेहाथ पकडले. त्यानंतर भर रस्त्यावर प्रियकर असलेल्या सहायक पोलिस निरीक्षक रवींद्र शिंदे याला कपडे फाटेपर्यंत बदडले. हा प्रकार शहरातील**



**बसस्थानकासमोर घडला. अजब प्रेमाच्या या गजब कहाणीची जोरदार चर्चा सुरू आहे.**

रवींद्र शिंदे हे पोलिस उपनिरीक्षक म्हणून २०१३ साली बीड पोलिस दलात भरती झाले. ▶▶ पान २ वर

# 'पवार विरुद्ध पवार' कबड्डीचा सामना रंगणार

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनची निवडणूक चार महिन्यांत घेण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने निवडणूक अधिकारी यांना शुक्रवारी दिले आहेत. तसेच हायकोर्टाचे निवृत्त न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली आहे.त्यामुळे शरद पवार विरुद्ध अजित पवार हा राजकीय आखाडा आपण पहातोच आहोत आता पुन्हा एकदा कबड्डी असोच्या निवडणूक काका पुतणे आमनेसामने येत असल्याने या निवडणुकीकडे राजकीय जाणकारांचे लक्ष लागले आहे.

गेल्या वर्षी महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनची निवडणूक जाहीर झाली होती. ही निवडणूक नॅशनल स्पोर्ट्स्? कोडनुसार व्हावी,




अशी मागणी करत सातारा जिल्हा हौशी कबड्डी असोसिएशनने ॲड. वैभव गायकवाड आणि रफिक सय्यद यांच्यामार्फत हायकोर्टात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर न्यायमूर्ती महेश सोनक आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यात हायकोर्टाने सविस्तर सुनावणी घेत नॅशनल स्पोर्टस्? कोडनुसारच ही निवडणूक ▶▶ पान २ वर

# महाराष्ट्रावर 'शक्ती' चक्रीवादळाचे संकट मराठवाड्यातही कोसळणार मुसळधार

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्रात गेल्या दोन दिवसांत पावसाने उसंत घेतली आहे. मात्र मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रासाठी पुढील काही दिवस धोक्याचे ठरू शकतात. हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार, अरबी समुद्रात शक्ती चक्रीवादळ धडकणार आहे. या हंगामातील हे पहिले चक्रीवादळ असून ते काल तीव्र झाले आहे. मात्र आज ते**



**अधिक तीव्र चक्रीवादळात रूपांतरित होण्याची शक्यता आहे. शक्ती चक्रीवादळामुळे महाराष्ट्रासाठी हवामान खात्याने सतर्कतेचा इशारा दिला आहे.**

या तीव्र शक्ती चक्रीवादळामुळे पुढील काही दिवसांत राज्यात सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. चक्रीवादळाचा वेग, उंच लाटा यामुळे समुद्रातील परिस्थिती खराब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्य प्रशासनाने सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर आपत्कालीन व्यवस्थापन प्रणाली कार्यान्वित केली असून स्थलांतराच्या ▶▶ पान २ वर

### अनुकंपा तत्वावरील १०८ उमेदवारांना नियुक्ती पत्र वितरण



बीड । प्रतिनिधी

मुख्यमंत्री यांच्या १५० दिवसांच्या कार्यक्रमाअंतर्गत अनुकंपा तत्वावरील गट-क संवर्गातील उमेदवार आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवेतून निवड झालेले लिपिक-टंकलेखक संवर्गातील उमेदवारांना आज नियुक्ती पत्र वितरीत करण्यात आली. येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा ▶▶ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०४ ऑक्टोबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ८४.०० क्विंटल | २,३०१ | २,८८७ | २,५३९ |
| ज्वारी/हायब्रिड: १०७.५० क्विंटल | २,००० | २,८८६ | २,३४४ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : ०.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| उडीद : ६१.०० क्विंटल | ३,९०१ | ५,५०० | ५,०२० |
| बाजरी: १२५.५० क्विंटल | २,१५० | २,८५१ | २,६१३ |
| मुग: १.५० क्विंटल | ७,७५१ | ७,७५१ | ७,७५१ |
| सोयाबीन: ३०.०० क्विंटल | ३,२०० | ३,८०० | ३,५६६ |
| हरभरा: ८.५० क्विंटल | ४,४०० | ६,४०१ | ५,०३३ |

cmyk

## अग्रलेख

# वैद्यकीय बोगसगिरी जीव घेतेय !

गेल्या काही काळापासून औषधांचा आणि बोगस डॉक्टरांचा, ज्यांना झोलाछाप डॉक्टरही म्हटले जाते त्यांचा विषय अत्यंत गंभीरपणे समोर येतो आहे. रूग्णाच्या आयुष्याशी हा विषय निगडीत असल्यामुळे केवळ राज्यांपुरतीच नाही तर केंद्रीय पातळीवर धडक मोहीम आणि धोरणाची आखणी करून हा धोका पूर्णत: नष्ट करणे आवश्यक असताना त्याकडे अद्याप म्हणावे तसे लक्षच दिले गेले नसल्याचे खेदाने म्हणावे लागते आहे. राजस्थानच्या भरतपूरमधील घटना धक्कादायक आहे. मुलाला सर्दी आणि खोकला असल्यामुळे सरकारी आरोग्य केंद्रात नेण्यात आले होते. डॉक्टरांनी औषधांसोबतच कफ सिरपही लिहून दिले. घरी आल्यावर मुलाच्या पालकांनी त्याला सिरप दिले. नंतर चार तास झाल्यावरही मुलाची काहीच हालचाल न दिसल्यामुळे पालक घाबरले आणि त्याला रूग्णालयात घेऊन गेले. मुलाला दाखल करून घेण्यात आले आणि उपचार सुरू असतानाच त्याचा मृत्यू झाला.

मध्य प्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यातही महिनाभरात ९ लहान मुलांचा मृत्यू झाला आहे. हे मृत्यूही कफ सिरप घेतल्यामुळेच झाल्याचा दावा करण्यात आला आहे. उपलब्ध माहितीनुसार सिरप घेतल्यामुळे मुलांची किडनी फेल होत असल्याचे निदर्शनास आले आहे. येथील जिल्हाधिकाऱ्यांनी दोन औषधांवर बंदी जाहीर केली आहे. तसेच एका फार्मास्युटिकल्स कंपनीवर छापेमारी केली आहे. अचानक आणि अत्यंत वेगाने या घटना घडल्यामुळे खळबळ निर्माण झाली. राजस्थान आणि मध्य प्रदेश या दोन्ही राज्यांतील आरोग्य विभाग खडबडून जागा झाला आहे. त्यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. चौकशीतून काय समोर यायचे ते येईलच;

मध्य प्रदेशात मुलांची किडनी निकामी होत असल्याचे आढळून आल्यामुळे जिल्हा प्रशासन हादरले आणि सर्व मुलांवर देखरेख ठेवली जात आहे. ज्या कंपनीवर छापा टाकण्यात आला त्यांनी चेन्नई येथून औषधे मागवली होती. त्यातील ९० टक्के औषधे त्यांनी एकट्या छिंदवाडा येथे पाठवली होती. येथील आजारी मुलांवर आता नागपूरमध्ये उपचार केले जात आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, बोगस डॉक्टरांकडून ही औषधे दिली गेलीत का याची आता चौकशी केली जाते आहे. दोन राज्यातील घटना सारख्या असल्या तरी त्यातही थोडा फरक आहे. राजस्थानात जे औषध दिले गेले ते तेथील सरकारी रूग्णालयातून मोफत दिले गेले आहे. तर मध्य प्रदेशातील काही प्रकरणात जे औषध दिले गेले ते मुळात लहान मुलांना देण्यास मनाई असलेले औषध आहे. थोडक्यात औषध आणि डॉक्टर या दोन्ही स्तरावर घोळ झाला असून त्यात काही निरागस चिमुरड्यांना त्यांचा काहीही दोष नसताना आपला जीव गमवावा लागला आहे. गेल्याच आठवड्यात राजस्थानात काही जिल्ह्यांत बोगस डॉक्टरांवर छापे टाकण्यात आले होते.

त्याबद्दल स्थानिक नागरिकांनी आनंद व्यक्त केल्याच्या बातम्या होत्या व त्याचवेळी असेही आढळून आले होते की बरेच बोगस डॉक्टर अनेक वर्षांपासून प्रॅक्टीस करत होते. जर अनेक वर्षे हा प्रकार राजरोस सुरू होता तर आपली यंत्रणा ढिसाळ आहे की सर्रास बोगसगिरी करणारे हे भोंदू इतके निर्ढावले आहेत की त्यांना आपण किती गंभीर गुन्हा करतो आहेत याची कल्पना असूनही त्याची भीती वाटत नव्हती? २०२२ मध्ये एका प्रख्यात उद्योगपतीने एका कार्यक्रमात या धोक्याची कल्पना सरकारला दिली होती. भारतातील एका सिरपमुळे आफ्रिकेतील एका देशात ६९ लहान मुलांचा मृत्यू झाल्याच्या बातमीकडे त्यांनी लक्ष वेधले होते. जागतिक आरोग्य संघटनेनेही भारतीय औषधाबाबत अलर्ट जारी केला होता. ज्या उद्योगपतीने असल्या प्रकारांमुळे जगात भारताची प्रतिमा खराब होते, देशाची नाचक्की होते हे चांगलेपणाने सांगण्याचा प्रयत्न केला त्यालाच घेरण्याचा अघोरी प्रकार समाजमाध्यमातून आणि अन्यत्रही पाहायला मिळाला.

अनेक बोगस डॉक्टर कोणतेही वैद्यकीय शिक्षण न घेता डॉक्टर असल्याचा बनाव करत आहेत. त्यांच्या चुकीच्या उपचारांमुळे रूग्णाच्या जीवालाच धोका निर्माण होतो. लोकांना मग ते ग्रामीण भागातील असोत वा शहरी भागातील वैद्यकीय बाबतीत ज्ञान नसतेच व त्याही पलीकडे डॉक्टर या व्यक्तीवर श्रद्धा असल्यामुळे ते शंका कुशंका उपस्थित करत नाहीत. महाराष्ट्रातही मुंबई, नागपूर अशा भागांत अलीकडच्या काळात बोगस व्यक्तींवर कारवाई झाली आहे. पण काही दिवसांनंतर पुन्हा नव्या ठिकाणी ही मंडळी आपला तंबू गाडून बस्तान बसवतात. बनावट औषधांचा व्यवसायही मांडला गेला आहे. राजधानी दिल्लीतच काही महिन्यांपूर्वी एक रॅकेट पकडले गेले होते. त्यात सरकारी रूग्णालयांमधील लोकांशी संगनमत करून हा काळा व्यवसाय सुरू असल्याचे निष्पन्न झाले होते. कर्करोगाशी संबंधित जी औषधे होती त्यात कोणतेही सक्रिय घटक नसल्याचे व नुसतेच पाणी किंवा तत्सम पदार्थ खरे वाटावे असे लेबल लावून बाटल्यांमधून विकले जात होते. काही औषधांवर क्युआर कोड असतो. तो स्कॅन करून औषधाची सत्यता तपासता येते; पण हे किती लोकांना कळते किंवा औषधे घेताना प्रत्येक वेळी विकत घेणाऱ्याचे चित्त शांत असेलच असे नाही. प्रत्येक गोष्टीला मज्जाव करण्यासाठी कायदे असतात. त्यातून कधी पळवाटा काढल्या जातात. मग कायद्यातील तरतुदी अधिक कठोर केल्या जातात. हे सगळे करायलाच हवे आहे. मात्र मुळात नियमितपणे बोगस डॉक्टर आणि बोगस औषधांची तपासणी करणे आवश्यक झाले आहे. औषधांच्या संदर्भात जो प्रोटोकॉल आहे त्याचेही पालन व्हायला हवे. केवळ डॉक्टरांनीच नाही तर प्रत्येकाने सतर्क राहण्याची नितांत आवश्यकता आहे.

# कपिलधारवाडीचे तात्काळ पुनर्वसन आवश्यक-प्रा.सुरेश नवले

**बीड । प्रतिनिधी**

**तालुक्यातील मौजे कपिलधारवाडी गावावर भूगर्भीय हालचालींचे संकट ओढवले असून, गावातील रस्ते, घरांच्या भिंतींना मोठ्या प्रमाणावर भेगा पडल्याने ग्रामस्थ भयभीत झाले आहेत. अनेक घरांना या भेगांमुळे तडे जाऊन वास्तव्य करणे धोकादायक ठरले आहे. परिणामी काही कुटुंबांनी स्वत:हून घरं रिकामी करून सुरक्षित ठिकाणी स्थलांतर केलं आहे.दरम्यान ही स्थिती लक्षात घेऊन कपिलधारवाडीचे तात्काळ पुनर्वसन आवश्यक असल्याने माजी मंत्री प्रा. सुरेश नवले यांनी म्हटले आहे.**

या गंभीर परिस्थितीची दखल घेत भूगर्भशास्त्रज्ञांसह महसूल विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. पाहणीनंतर गावात भूगर्भातील हालचाली सुरू असल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून, संपूर्ण गाव भयग्रस्त वातावरणात जगत आहे. महिलांसह लहान मुलांमध्येही भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. तात्पुरत्या उपाययोजनेअंतर्गत ग्रामस्थांसाठी कपिलधार देवस्थान परिसरात निवाऱ्याची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र हा केवळ तात्पुरता उपाय असून, कायमस्वरूपी सुरक्षिततेसाठी गावाचे पुनर्वसन अपरिहार्य असल्याचे प्रा. सुरेश नवले यांनी स्पष्ट केले आहे. गाव पुनर्वसनासाठी पाली ग्रामपंचायत हद्दीतील गट क्रमांक ६११ मधील ६८ एकर गायरान जमीन उपयुक्त ठरू शकते, असा प्रस्ताव ग्रामस्थांनी एकमुखाने मांडला आहे. ही जागा भूगोलाच्या दृष्टीने सुरक्षित असून, येथील शेती आणि नव्या वस्तीचा समन्वयही सहज शक्य आहे.



त्यामुळे या ठिकाणी कपिलधारवाडीचे पुनर्वसन करण्यात यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. प्रा. नवले यांनी शासन आणि प्रशासनाकडे सादर केलेल्या पत्रात म्हटले आहे की, गट क्रमांक ६११ मधील गायरान जागेवर कपिलधारवाडीचे पुनर्वसन हा कायमस्वरूपी आणि तर्कसंगत तोडगा ठरू शकेल. प्रशासनाने याबाबत सकारात्मक भूमिका घेऊन तातडीने प्रस्ताव शासनाकडे पाठवावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. सध्या गावातील नागरिक अत्यंत भीतीच्या छायेत दिवस काढत असून, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर परिस्थिती अधिकच गंभीर होण्याची शक्यता आहे. अशा वेळी कपिलधारवाडीचे तात्काळ पुनर्वसन करणे ही मानवी आणि प्रशासकीय दोन्ही दृष्ट्या तातडीची गरज असल्याचे मत प्रा.नवले यांनी व्यक्त केले आहे.यावेळी शिवाजीराव नवले श्रीमंतरावजी उबाळे केशव शिंदे रुद्राक्ष माकले सुदर्शन शिंदे बंडू भोसले संजय सल्लागार योगेश सव्वाशे नवनाथ शिंदे लक्ष्मण जाधव नानाभाऊ शिंदे बप्पा शिंदे दुर्गाबाई शिंदे अहिल्याबाई शिंदे या बाई शिंदे साहेबराव शिंदे आशाबाई माखले आदी उपस्थित होते.

# ना.पंकजाताई मुंडे यांनी व्हीसीद्वारे सहभाग घेऊन केले सर्व उमेदवारांचे अभिनंदन!

## जालन्यात १२८ अनुकंपा उमेदवारांना शासन नियुक्तीचे आदेश वितरित

**जालना । प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री महोदयांच्या १५० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस प्राप्त लिपिक- टंकलेखक संवर्गातील एकुण १२८ उमेदवारांना आज शासकीय नियुक्ती आदेशाचे वितरण करण्यात आले. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा जिल्हयाच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी व्हीसीद्वारे यात सहभाग घेऊन शासकीय नोकरी मिळालेल्या सर्व उमेदवारांचे अभिनंदन केले आहे.**

अनुकंपा नियुक्ती प्रक्रियेस गती आणून पात्र उमेदवारांना रोजगार उपलब्ध करून देणे हा प्रमुख उद्देश असलेल्या या कार्यक्रमातंर्गत अनुकंपा नियुक्ती (गट-क व गट-ड) उमेदवार व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस प्राप्त लिपिक- टंकलेखक संवर्गातील एकुण १२८ उमेदवारांना नियुक्ती आदेशाचे वितरण आज जिल्हाधिकारी कार्यालयात मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी एकुण १२८ उमेदवारांचे शासकीय नोकरीचे स्वप्न साकार झाले, असा सुर कार्यक्रमातून उमटला. अनुकंपा व लिपीक भरती नियुक्ती



आदेश वितरणाचा जिल्हास्तरीय कार्यक्रम आ. अर्जुन खोतकर, आ. बबनराव लोणीकर, आ. नारायण कुचे, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर यांच्या उपस्थितीत पार पडला. राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी दृकश्राव्य प्रणालीद्वारे सहभागी होत नियुक्ती आदेशाचे वाटप करण्यात आलेल्या उमेदवारांचे मन:पुर्वक अभिनंदन करुन भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यात सर्वत्र रेड अलर्ट जाहीर झाल्यानंतर जिल्हा प्रशासनाने तातडीने हालचाली करत अधिकाधिक नागरिकांना, पशुधनाला सुरक्षित स्थळी हलवले. रेड अलर्टमध्ये जिल्हा प्रशासनाने समन्वय ठेवून खुप छान काम केले. जिल्हा प्रशासनाचा प्रत्येक कामात नेहमी पुढाकार असतो. आपले काम कौतुकास्पद आहे, अशा शब्दांत कौतुक केले. शासकीय सेवेत कार्यरत असतांना अधिकारी व कर्मचाऱ्याचे निधन झाल्यास त्याच्या कुटुंबावर ओढवणाऱ्या आर्थिक आपत्तीतून कुटुंबियांना सावरण्यासाठी कुटुंबातील एका सदस्यास अनुकंपा तत्वावर शासकीय सेवेत नियुक्ती देण्याचे सुधारित धोरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राज्य शासनाने पारित केले होते. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात मागील महिन्यात झालेल्या मेळाव्यात उमदेवारांना शासन निर्णय व नियुक्ती प्रकियेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यात अनुकंपा तत्वावर गट-‘क’ आणि गट-‘ड’ पदासाठी प्रतिक्षा यादीतील ७९ उमेदवारांची, तर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडूनही ४९ उमेदवारांची नियुक्तीकरिता शिफारस करण्यात आली आहे. अशी एकुण १२८ उमेदवारांना नियुक्तीपत्रे यावेळी देण्यात आली.

## पान ६ वरून...

### आंतरराष्ट्रीय मास्टर्स

स्पर्धेतून संतोष कदम यांची निवड झाली आहे.या संघात महाराष्ट्रासह केरळ,कर्नाटक,दिल्लीच्या खेळाडूंचा समावेश आहे.यापूर्वी त्यांनी अनेकवेळा राष्ट्रीय व राज्य स्पर्धेत चमकदार कामगिरी केली असून राज्य व विद्यापीठ संघाचे कर्णधारपद भूषविले आहे. अश्वमेध क्रीडा स्पर्धेतील पहिले उत्कृष्ट खेळाडू आहेत. महाराष्ट्र संघाचे व विद्यापीठाचे प्रशिक्षक व निवड समिती सदस्य म्हणूनही त्यांनी उत्तम कामगिरी बजावली आहे. त्यांच्या या निवडीचे कौतुक योगेश्वरी क्रीडा मंडळाचे सर्व सभासद यांच्यासह व्हॉलीबॉल खेळाडूंनी केले आहे.

------------------

### बिंदुसरा नदीपात्रात

समाजसेवक रामनाथ खोड यांनी प्रशासनावर सडकून टीका करताना म्हटले. पालकमंत्र्यांच्या आगमनाच्या आधी जर नदीपात्र रस्ते साफ होत स्वच्छ होत असेल, तर पालकमंत्र्यांनी रोज बीडला यावे. मग कदाचित स्वच्छतेला सातत्य लाभेल.४० वर्षांनंतरची पहिली स्वच्छता गाजली होती, पण लाखो रुपये खर्च करुन केलेल्या बिंदूसरेची अवस्था पुन्हा शहराची आत्मा पुन्हा घाबरलेली आहे; बिंदुसरा फक्त पाण्याची नाही, प्रशासनाची परीक्षा आहे!

------------------

### आष्टीत मोकाट कुत्र्यांचा

घालून मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा,अन्यथा आंदोलन करण्यात येईल,असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

**एकटं फिरणारे किंवा न भुंकणारे कुत्रे हल्ला करतात**

दरम्यान वीस ते पंचवीस कुत्रे सोबतच गावात फिरतात त्यामुळे लोकं घाबरतात भुंकणारे कुत्रे आले तर लोकं सावध होतात पण जर शांत बसणारे कुत्रे अचानक चावा घेतात. आष्टी शहरात दिवसान दिवस मोकाट कुत्री जनावरांमुळे नागरिकांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे तरी नगरपंचायत लवकरात लवकर मोकाट जनावरे व मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिकातून होत आहे.

------------------

### विवाहीतेशी गैरवर्तन

घरात असतांना अंकुश मंडलिक हा जोरजोराने ओरडत घरात आला, भावाला शिवीगाळ करून मारहाण केली. माझ्याशी गैरवर्तन करून जातीवाचक शिवीगाळ केली, त्याचवेळी माझे वडिल वाचवण्यासाठी आले असता त्यांच्या हातावर चाकू मारून जखमी केले. सदरील तक्रारीवरून अंकुश मंडलिक याच्याविरूध्द तलवाडा पोलीस ठाण्यात बीएनएस कलम ११५ (२), ११८(१), ३५२, ७५, ७४ सह अनुसूचित जाती आणि जमाती प्रतिबंधक काद्यांतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.

------------------

### सोशल फाउंडेशन

६० हिरापूर येथे ५० अशा एकूण ७०० कुटुंबांना किट वाटप करून आधार देण्याचे काम या सामाजिक संस्थाने केले. किट वाटप करते वेळी गावातील सरपंच, उपसरपंच, सदस्य उपस्थित होते.ता. शिरोळ,जि. कोल्हापूर यांच्या वतीने नगरसेवक नितीन बागे इम्रान पाटील ओमकार मुडशी मनीष शिंदे अल्ताफ आंबेकरी हे सर्व किट चा ट्रॅक घेऊन उपस्थित होते. संदीप खोमणे तहसीलदार गेवराई यांच्या मार्गदर्शनाखाली किट वाटप करते वेळी तहसिल कार्यालय गेवराई येथील नायब तहसीलदार सुभाष कट्टे, पुरवठा निरीक्षक मोरे , मंडळ अधिकारी बाबा बडे, मंडळ अधिकारी अशोक डरफे, गोडाऊन किप्पर .सचिन जाधव, जवंजाळ, कृष्णा मिसाळ, तलाठी . संकेत भुजबळ, निखिल कोळी, निखिल तपसे, जावेद शेख, सुनील पांचाळ उपस्थित होते. वरील गावात किट वाटप केल्यामुळे राजापूर चे सरपंच भास्कर गवते, मनुबाई जवळा येथे सरपंच दिगंबर खरात, काठोडचे सरपंच जालिंदर कोरे, रामपुरी चे सरपंच जगदीश मस्के, श्रीपतअंतराला, गोपत पिंपळगाव चे सरपंच यांनी डॉ.आप्पासाहेब उर्फ सारे पाटील सोशल फाउंडेशन आणि दत्त उद्योग समूहाचे सर्वेसर्वा उद्यान पंडित मा. गणपतराव पाटील दादा ता. शिरोळ,जि. कोल्हापूर यांचे आभार मानले.

------------------

### स्व.काकूंचे जीवन परोपकारासाठीच

ते म्हणाले की, बीड जिल्ह्यातील आदराचे स्थान म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते त्या स्व.काकूंच्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठी मोठा चाहता वर्ग उपस्थित असतो. एवढ्या मोठ्या कार्यक्रमात कुठलीही कसर न करता योग्य आणि सुंदर नियोजन करून हा स्मृती सोहळा साजरा होत असतो. पुण्याचा संचय करतो तो पुण्य आत्मा असतो परोपकार हेच पुण्य असते तसे काकूंचे काम होते. हजारो परिवारांना आधार देणारी परोपकारी महिला म्हणून काकूंचा आदर्श घेण्यासारखा आहे. संपूर्ण आयुष्य त्यांनी परोपकारी म्हणून जगले. जगातले सर्वात मोठे तीर्थक्षेत्र म्हणजे आई आणि वडील आहेत आधी त्यांची सेवा करा बाकीचे पुण्य आपोआप पदरात पडेल. तीर्थालाही पवित्र करणारी सेवा म्हणजे माता-पित्याची सेवा आहे. भक्त पुंडलिकाच्या भक्तीला भारावून जगाचा बाप आजही पंढरपुरात उभा आहे हे माता-पित्यांचे प्रेम आज जगाला प्रेरणा देणारे आहे. जेव्हा चांगले दिवस येतात तेव्हा आईबाप जिवंत नसतात ज्यांचे आहेत ते भाग्यवान आहेत पण काही कारटे आपल्या आई बापाला वाऱ्यावर सोडून देतात जन्मदात्याच्या आनंदात जो आपला आनंद शोधतो त्याला देवाची सेवा करण्याची गरज नाही, आई-वडिलांचा आशीर्वाद आणि आनंद आयुष्यभर पुरतो त्यामुळे रडायचं असेल तर देवाजवळ रडा माणसा पुढे रडू नका देव मार्ग काढतो पण माणूस तुमची फुकटची प्रसिद्धी करतो जोपर्यंत जिवात जीव आहे तोपर्यंतच मनुष्याला किंमत असते त्यामुळे चांगले कर्म केले तर नाव होईल आणि कुकर्म केले तर बरं झालं हे गेले अशी वाक्य ऐकायला येतील त्यामुळे परोपकारी जीवन जगून सदाचारी व्हा असे ते म्हणाले.

------------------

### नाम फाऊंडेशनची शेतकऱ्यांच्या

व्यथांवर फुंकर घालण्यात आली. यावेळी राजेसाहेब काका पवळ, नाम फाऊंडेशनचे शिवाजीराव वाटमोडे, शेतकरी मदत टीमचे दादासाहेब पवळ, जगदिश जाधव, दादासाहेब राजळकर, अमोल पवार, जालिंदर रसाळ, राहुल रडे, सोमनाथ राजळकर, अर्जुन पवळ, महेश शेजाळ, बबलू कांगडे, पपू पोकळे, दिनेश गुळवे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. सिंदफणा, डोंबरी व विद्रूपा या नद्यांना आलेल्या महापुराने गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग व सिंदफणा काठच्या शेतकर्यांचे मोठे नुकसान झाले आहे. मोसंबीच्या अनेक बागा उन्मळून पडल्या आहेत, तर कापूस, सोयाबीन, ऊस, तूर आदी पिकांचे नुकसान झाले आहे. पूरग्रस्त शेतकर्यांच्या व्यथा पत्रकार विलास बडे यांनी समाजासमोर आणल्या. अतिशय विदारक हे चित्र असल्याने व शेतकर्यावर वाईट वेळ आल्याने अभिनेते नाना पाटेकर व मकरंद अनासपुरे यांनी हळहळ व्यक्त करत शेतकर्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला. शेतकर्यांच्या पाठीशी आपण असल्याचे सांगितले. शेतकर्यांचा दसरा, दिवाळी गोड व्हावी यासाठी प्राथमिक स्वरूपाची मदत म्हणून किराणा किट वाटप करत शेतकर्यांच्या दु:खावर फुंकर घातली. यावेळी सर्व शेतकर्यांच्या वतीने नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे व नाम फाऊंडेशनचे आभार व्यक्त करण्यात आले.

------------------

### जाहिरात न देणाऱ्या नेत्यांच्या

महोत्सव साजरे करून बायका नाचवायच्या व कोट्यवधीचा खर्च करायचा असेही काही नेत्यांचे धंदे आहेत. तर काही नेते तर स्वत:ला राष्ट्रीय नेते म्हणवून घेतात व नुसते गोड बोलतात. गोड बोलण्याने वृत्तपत्रे चालत नाहीत किंवा तुमच्या मोठेपणाच्या कोरड्या आश्वासनावर सुद्धा वृत्तपत्रे चालत नाहीत. वृत्तपत्राच्या खर्चाचा विचार केल्यास आज अनेक पटींनी खर्च वाढलेला आहे. तीन-पाच रूपयात काय मिळते? वृत्तपत्रे सामान्य माणसांचा आजही मोठा आधार आणि विश्वास आहे. सामान्य माणूस मग तो ग्रामीण भागातील असो की शहरी माणुस असो तो आजही लाखोंच्या संख्येने वृत्तपत्रांचे वाचक आहेत. आम्ही छापलेल्या बातम्या त्यांच्यापर्यंत पोचतात. अजूनही सामान्य जनतेचा छापील वृत्तपत्रावर व त्यातील बातम्यावरच विश्वास आहे आणि म्हणुन ही सर्व मराठी वृत्तपत्रे ठामपणे उभी राहणे आवश्यक आहे. म्हणून नेते व कार्यकर्त्यांच्या जाहिरातरूपाने सहकार्याची अपेक्षा आहे. परंतु जे नेते व कार्यकर्ते मग ते कोणत्याही पक्षाचे असोत. स्थानिक वृत्तपत्रांना जाहिराती देत नसतील त्यांच्या बातम्यावर बहिष्कार टाकण्याचा व त्यांच्या बातम्या छापण्यास टाळण्याच्या बीडच्या संपादकांनी आपापसात संवाद करून निर्णय घेतला आहे. लवकरच सर्व संपादकांची बैठक बोलावली जाणार असल्याचे संयोजकांनी म्हटले आहे.

---------

## पान १ वरून...

### अतिवृष्टीत मागणी हेक्टरी ५०

यांनी पूरग्रस्त भागांचे दौरे केले. तत्पूर्वी सरकारने २२१५ कोटी रुपयांची मदतही जाहीर केली. मात्र, शेतकऱ्यांना ही मदत कुठपर्यंत पुरणार असा प्रश्न आहे. त्यातच, मे महिन्यात मिळालेल्या मदतीनंतर शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे. मे महिन्यात अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. इंदापूर तालुक्यातील सणसर गावच्या शेतकऱ्याचे पावणे दोन लाखांचे नुकसान झाले होते, पण सरकारकडून त्यांस केवळ २५५० रुपये मदत मिळाल्याचं त्यांनी म्हटलं आहे.शेतकऱ्याचे जवळपास पावणे दोन लाख रुपयांचे नुकसान झाल्यानंतर तब्बल अडीच हजार नुकसान भरपाई आल्याने शेतकरी आक्रमक झाला आहे. आता, हेच पैसे आम्ही कृषीमंत्र्यांना देणार असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. इंदापूर तालुक्यातील सणसर गावातील सुमित निंबाळकर यांना ही मदत आली असून इतर शेतकरी अद्यापही मदतीच्या प्रतीक्षेत आहेत. राज्यातील बुहतांश जिल्ह्यात यंदा अतिवृष्टी झाल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला असून आर्थिक संकटात सापडला आहे. आर्थिक संकटात सापडेल्या शेतकऱ्यांना आता सरकारकडून मदतीची अपेक्षा आहे. मात्र, मे महिन्यात झालेल्या अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात मदत मिळण्यास सुरुवात झाली असून मिळणारी मदत अत्यंत तोडकी असल्याने शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे. तसेच, हेक्टरी ५० हजार रुपये मदत देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. मे आणि सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झालं असून शेतकरी आक्रमक झाले आहेत. जर आम्हाला मदत करायची असेल तर भरीव स्वरूपाची करा, अन्यथा शेतकऱ्यांची थट्टा करू नका, अशी भावना संतप्त शेतकऱ्यांची आहे. जरी आम्हाला मदत आली तरी आम्ही ती मदत सरकारला परत देऊ, असा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे एकंदरीत मे महिन्यात झालेली अतिवृष्टी आणि नुकसान यासाठी विभागीय आयुक्तांनी पाठवलेल्या अहवालानुसार हि मदत करण्यात आली मात्र त्यानंतर झालेल्या अवकाळी पूरस्थिती आणि अतिवृष्टी या बाबत आणखी मदत मिळण्याची शक्यता आहे.

--------

### आरक्षण आमच्या हक्काचे मुख्यमंत्र्यांनी

असे मनोज जरांगे पाटील म्हणाले.ओबीसींचा नेता कोणी नाही. जास्त बोलतात म्हणून मुख्यमंत्र्यांनी बोलवून घेतले आहे. मुख्यमंत्र्यांना यांची औकात कळली आहे. हे ओबीसींचे नेते होऊ शकत नाहीत, हे देवेंद्र फडणवीस यांच्या लक्षात आलंय. त्यामुळे बापाची पेंड आहे का? जीआर रद्द करणं. हैदराबाद गॅझेटच्या आधारे जीआर काढलाय. आमची पण मागणी आहे, १९९४ चा जीआर रद्द करा. वरचं २ टक्के आरक्षण ते पण रद्द करा. काहींनी असं सांगितलं की, आम्ही बंजारा समाजासारखे दिसतो. म्हणून बंजारा समाजाचं आरक्षण घेतलं, ते बंजारा समाजासारखे दिसत नाहीत. त्यांना बाहेर काढा. यापुढे जशाला तशी फाईट होणार''असे मनोज जरांगे पाटील म्हणाले.

-------------

### मुख्यमंत्र्यांसमोर छगन भुजबळ

समाजाच्या नेत्यांची एक बैठक आयोजित केली. त्यामध्ये हैदराबाद गॅझेट रद्द करा अशी मागणी ओबीसी नेत्यांनी केली.मुख्यमंत्र्यांनी बोलावलेल्या बैठकीत अजित पवार, एकनाथ शिंदे, पंकजा मुंडे, विजय वडेट्टीवार, चंद्रशेखर बावनकुळे. छगन भुजबळ यांच्यासह इतर अनेक नेते उपस्थित होते. छगन भुजबळ हे या बैठकीत आक्रमक झाल्याचं दिसून आलं. विधी आणि न्याय विभागाची परवानगी न घेता हैदराबाद गॅझेटच्या संदर्भात तुम्ही शासन निर्णय कसा काढला असा प्रश्न भुजबळांनी विचारला. अनेक ठिकाणी खाडाखोड करून, नोंदी बदलून कुणबी प्रमाणपत्र काढली जात असल्याचा दावा त्यांनी केला.या प्रकरणी काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, ‘‘मराठा समाजाचे कुणबीकरण करण्याचा जीआर काढला त्यावर आणि ओबीसींच्या अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली. त्यामध्ये अनेक नेत्यांनी आपली भूमिका मांडली. यामध्ये आम्हाला सरकारकडून सकारात्मक निर्णय अपेक्षित आहे. राज्य सरकारच्या या जीआरमुळे ओबीसी समाज अडचणीत आला असून त्यांचे अस्तित्व संपण्याच्या मार्गावर आहे. मराठवाड्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

------------

### नाशिकमध्ये आदिवासी

करण्यात आला असून परिस्थिती नियंत्रणात आहे.मिळालेल्या माहितीनुसार, नाशिकच्या कळवण पोलिस स्थानकावर संतप्त आदिवासी आंदोलकांच्या जमावाने पोलिस ठाण्यावर दगडफेक केल्याचा प्रकार घडल्याने एकच धावपळ उडाली. कळवण खुर्द येथील शेतक-याने शेतमजूर विठोबा पवार यांचे अपहरण करून खून केल्याचा आरोप करीत संबंधितांवर गुन्हा दाखल करून अटक करावी, या मागणीसाठी आदिवासी बांधवांनी कळवण पोलिसांसमोर ठिय्या आंदोलन सुरू केले होते. दरम्यान, पोलिस व आंदोलनकर्त्यांमध्ये वाद होऊन त्यातूनच आदिवासी बांधवांनी थेट पोलिस स्थानकावरच दगडफेक केल्याने एकच धावपळ उडाली.दगडफेकीत पोलिस कर्मचारी व पत्रकार जखमी झाले आहेत. तर पोलिस वाहनाच्या काचाही फुटल्या.

----------------

### लिंबारुईत दलित

लिंबारुई देवीचे येथील दलित समाजाने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की लिंबारुई येथील सुवर्ण समाजाने मागील दोन महिन्यापासून मागासवर्गीय समाजावर बहिष्कार टाकला आहे लिंबारुई परिसरातील गायरान जमिनीमध्ये गेल्या दोन महिन्यापासून धम्म ज्योत बौद्ध विहारासाठी सदरील जागेवर बौद्ध विहार फलक व निळा झेंडा उभा केला होता त्या ठिकाणी गेल्या दोन महिन्यापासून गावातील काही दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांपासून मागासवर्गीय समाजाला गावात बहिष्कृत केल्याच्या कारणाने त्या जागेवर पोलीस संरक्षण ठेवण्यात आलेले आहे असे असताना दोन समाजात तेढ निर्माण व्हावे म्हणून गावातील काही व्यक्तींनी अतिक्रमणित जागेवर निळ्या झेंड्याजवळ भगवा झेंडा व छत्रपती शिवाजी महाराज भवन असा फलक लावून गावातील मागासवर्गीय समाजावर दहशत निर्माण करत बहिष्कृत केले आहे रेशन दुकान किराणा दुकान व इतर सार्वजनिक ठिकाणी मागासवर्गीय समाजातील व्यक्ती गेले असता लोक त्यांना अपमानित करून आपल्या घरी परत जा असे म्हणून त्यांचा अपमान करत आहेत दुकानावर ही देखील खरेदी करायला गेल्यास साहित्य दिले जात नाही दळण दिले जात नाही याबाबत पिंपळनेर पोलीस ठाणे येथे लेखी तक्रार केली असता ठाणे प्रभारी घुगे यांनी गावांमध्ये जाऊन सुवर्ण समाजाची समजूत घातली होती परंतु तेथील काही मानसिकतेच्या लोकांनी ऐकले नाही उलट गावाला लागून असलेल्या मागासवर्गीयांच्या गायरान जमिनीवरील बौद्ध विहाराच्या जागेवर भगवा झेंडा लावून छत्रपती शिवाजी महाराज भवन असा फलक लावला आहे संबंधितावर योग्य ती कारवाई करण्यात यावी अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशा राहील दिलेल्या निवेदनात दिला आहे निवेदनामध्ये गावातील अनेकांची नावे देखील घेतली आहेत,

--------

### ‘पवार विरुद्ध पवार’ कबड्डीचा

घेण्याची सक्त ताकीद देत येत्या चार महिन्यांत ही निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश निवडणूक अधिका-यांना दिले.कबड्डी असोसिएशनच्या निवडणुकीसाठी नियमावली तयार करण्यात आली आहे. यात निवडणुकीसाठी उमेदवाराला ७० वर्षांची वयोमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. तसेच अन्यही काही निर्बंध घालण्यात आले आहेत. मात्र, वयोमर्यादेची प्रमुख अट डावलून ही निवडणूक जाहीर करण्यात आली आहे, असा आरोप या याचिकेत करण्यात आला आहे. त्यामुळे ही निवडणूक नियमानुसारच व्हावी, अशी प्रमुख मागणी या याचिकेत करण्यात आली आहे.

-----------------

### लंपट पोलीस निरीक्षकाला

पीडिता आणि शिंदे हे शेजारीच राहत असल्याने ओळख झाली. नंतर तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढून अत्याचार केला. बीडहून शिंदे यांची बदली धाराशिवला झाली. परंतु त्याने त्रास देणे सोडले नाही. पिस्तूलचा धाक दाखवून त्याने जून आणि जुलै २०२५ मध्ये पीडितेवर घरात घुसून अत्याचार केला. तसेच तिला मारहाणही केली. यात पीडिता गर्भवतीही राहिल्याची माहिती आहे.याप्रकरणी जुलै महिन्याच्या अखेरीस शिवाजीनगर पोलिस ठाण्यात शिंदेविरोधात अत्याचारासह इतर कलमांन्वये गुन्हा दाखल झाला होता. तेव्हापासून तो फरारच आहे. शिवाजीनगर पोलिसांनी त्याच्या अटकेसाठी कोणतेही प्रयत्न न करता त्याला अभय दिल्याचा आरोप पीडितेच्या पतीने केला.पीडिता आणि रवींद्र शिंदे हे कारमधून (एमएच २३ बीसी ३४०२) बीड शहरातील भाग्यनगर भागात जात होते. पीडितेच्या पतीने पाहताच पाठलाग केला. तुळजाई चौक, नगर नाका, बसस्थानक मार्गे बाहेर जाण्यापूर्वीच पतीने दुचाकी आडवी लावून शिंदेला खाली खेचले. त्याला कपडे फाटेपर्यंत बदडले. पीडिताही तोंड बांधून तेव्हा कारमध्येच बसलेली होती. तसेच शिंदेही तोंड बांधून होता. त्यानंतर पीडितेच्या पतीने शिवाजीनगर पोलिस ठाणे गाठत शिंदेविरोधात तक्रार दिली.

--------

### अनुकंपा तत्वावरील १०८

नियोजन सभागृहात आज आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय रोजगार मेळाव्यात उमेदवारांना नियुक्ती पत्र वितरीत करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत, अपर जिल्हाधिकारी हरीष धार्मिक, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी एम.एस.साळवे, जिल्हा कोषागार अधिकारी लहू गळगुंडे, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम रवी तोंडे, जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख कृष्णा शिंदे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी प्रविण उखळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. शासकीय सेवेत असतांना कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्यास त्याच्या पत्नी अथवा अपत्याला नोकरी दिली जाते. परंतू, तांत्रिक कारणे किंवा काही प्रशासकीय कारणास्तव या नियुक्त्या रखडलेल्या होत्या. त्यामुळे त्यांना दीर्घ प्रतिक्षा करावी लागत होती. अशा या संवेदनशील विषयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घालून नवीन अनुकंपा धोरण तयार केले. त्याचाच परिणाम म्हणून आज अनुकंपा प्रतिक्षा यादीतील अनुकंपा उमेदवारांना एकाच वेळी नियुक्ती पत्रे देण्यात आली. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १५० दिवसांच्या प्रशासकीय सुधारणांच्या हाती घेतलेल्या कार्यक्रमातंर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत परीक्षा घेण्यात आलेल्या लिपिक-टंकलेखक श्रेणीतील उमेदवारांना देखील नियुक्तीपत्रे देण्यात आली. आज आयोजित या मेळाव्यात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत आणि अपर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक यांच्या हस्ते महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवेतून निवड झालेले लिपिक-टंकलेखक संवर्गातील ६४ उमेदवार तसेच अनुकंपा तत्वावरील गट-क संवर्गातील ३६ आणि गट-ड संवर्गातील ०८ उमेदवार अशा एकूण १०८ उमेदवारांना नियुक्ती आदेशांचे वितरण करण्यात आले. जिल्हास्तरीय रोजगार मेळाव्यास संबंधित उमेदवार व विविध विभागातील अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थिती होती.

-------------

### महाराष्ट्रावर ‘शक्ती’चक्रीवादळाचे संकट

उपाययोजनांचीही तयारी केली आहे.हवामान विभागाने चक्रीवादळामुळे महाराष्ट्रात सतर्कतेचा इशारा दिला असून, ७ ऑक्टोबरपर्यंत मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांना अधिक सतर्क राहण्याचे सांगण्यात आले आहे. ५ ऑक्टोबरपर्यंत महाराष्ट्राच्या उत्तर किनारपट्टीवरील समुद्राची स्थिती अत्यंत धोकादायक असणार आहे.चक्रीवादळ तीव्र होण्याची शक्यता असल्याने सरकारकडून मच्छिमारांना समुद्रात न जाण्याचा इशारा देण्यात आला आहे. बोटींना बंदरातच थांबण्याचे सांगितले असून जे समुद्रात आहेत त्यांना तात्काळ मागे परत येण्याचे सांगितले आहे. तसेच किनारपट्टीवरील रहिवाशांना सावधानतेचा इशारा दिला आहे. भरतीमुळे पाणी साचू शकते, अशात सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.हवामान खात्याने किनारपट्टीच्या भागांव्यतिरिक्त, महाराष्ट्रात विदर्भ आणि मराठवाड्यातील काही भागांमध्येही मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे. तर उत्तर कोकणात सखल भागांमध्ये पूर येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे पूरस्थितीमुळे जनजीवन विस्कळीत होण्याची शक्यता पाहता राज्य सरकारने जिल्हा प्रशासनांना संभाव्य आपत्कालीन स्थितीत तयार राहण्याचे आदेश दिले आहेत.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार दि. ०५ ऑक्टोबर २०२५ | ३

## थोडक्यात...

### गोरक्षनाथ टेकडीवर राजेंद्र महाराज चोरडिया यांचे कीर्तन

बीड । प्रतिनिधी



विसाव्या शतकातील महान संत किसनबाबा यांच्या २८ व्या वर्षातील दुसऱ्या पुण्यतिथी आश्विन शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी (ता. जि. बीड) येथे धार्मिक वातावरणात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचा मुख्य आकर्षण म्हणून मंगळवार, दिनांक ७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत ह.भ.प. राजेंद्र महाराज चोरडिया (संभाजीनगर) यांचे कीर्तन होणार आहे. या कीर्तनाद्वारे संत विचारांचा संदेश भाविकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.पुण्यतिथी निमित्त सकाळी ८ वाजता बाबांचा पालखी सोहळा निघणार असून, सकाळी ९ ते १० वाजेपर्यंत गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणा पार पडणार आहे. कार्यक्रमानंतर सर्व भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, यासाठी समस्त गावकरी देवळा यांनी पुढाकार घेतला आहे.या कार्यक्रमात भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संतकृपेचा लाभ घ्यावा, असे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प. नवनाथ महाराज यांनी आवाहन केले आहे.

### कोजागिरी पौर्णिमा रोजी महाप्रसादाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

शहरातील पेठ बीड भागातील यशवंतराव उद्यान परिसरातील श्री संत माई नवरात्र उत्सव निमित्ताने सोमवार रोजी संध्याकाळी सात वाजता महाप्रसादा वाटपाचेआयोजन करण्यात आल्याचे उत्सव समितीच्या वतीने कळविण्यात आले आहे. गत २४ वर्षा पूर्वी अरुण पवार यांनी या उत्सव समितीची स्थापना केली होती त्यावेळेस पासून सातत्याने नवरात्र महोत्सवानिमित्त आई तुळजाभवानीची प्रतिमा स्थापित करून दहा दिवस पूर्ण श्रद्धा भावनेतून भक्त लोक देवीची आराधना करतात. या महोत्सवाची सांगता सोमवार अश्विनी पौर्णिमा या दिवशी महाप्रसादाचे वाटपने होणार आहे. या महाप्रसादाचा लाभ पंचक्रोशीतील देवी भक्तांनी घ्यावा असे आवाहनही करण्यात आले आहे .यावर्षीची कार्यकारणी याप्रमाणे अध्यक्ष सुरज राऊत, उपाध्यक्ष सचिन मोहारे, सचिव प्रसाद बेदरकर, कोषाध्यक्ष मुन्ना लुचारे, सदस्य म्हणून लखन परदेशी, टिंकू खांडे, कृष्णा परदेशी ,नितीन पवार ,मंगेश परमेश्वरी, रविदा मुने त्यांना हिरालाल चौक आंबेडकर पुतळा परिसरातील व्यापारी सर्वोत्तरी परीने मदत करीत आहे.

### उपकार्यकारी अभियंता सय्यद हामेद सलीम साहेब यांचा सत्कार



बीड । प्रतिनिधी

येथील जिल्हा परिषद जलसिंचन विभागात कार्यरत असलेले मा. सय्यद हामेद सलीम साहेब यांची उपकार्यकारी अभियंता, जलसिंचन विभाग, परळी (वै.) येथे पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. सलीम साहेब यांची पदोन्नती झाल्याबद्दल क्रांतिकारी लाईन स्टॉप सेनेच्या वतीने त्यांचा नुकताच बीड येथे सत्कार करण्यात आला. यावेळी सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.या सत्कार समारंभास मोहम्मद अझरुद्दीन (ए.एस. गोलू), प्रादेशिक अध्यक्ष शेख अमीर मदनी, श्री अश्वलिंग बरे, श्री गोकुळ गायकवाड, श्री रजनीकांत तागड, श्री प्रवीण शिंदे, श्री दत्ता माटे, श्री रवी देशमुख, श्री अजय गलांडे आणि शेख मुजू यांच्यासह सेनेचे अन्य सदस्य व कार्यकर्ते उपस्थित होते.



छत्रपती संभाजीनगर येथील बीबीसी मराठीचे पत्रकार मित्र श्रीकांत बंगाळे व त्यांच्या सोसायटी मधील सदस्यांनी आज कडा व देवीनिमगाव येथील पूरग्रस्त पन्नास कुटुंबांना किराणा किट व शैक्षणिक साहित्य वाटप केले. यावेळी सरपंच संदीप मार्कंडे,पत्रकार रघुनाथ कर्डीले,राजेश राऊत,बिटूनाना पोपळे व ग्रामस्थ उपस्थित होते.

# नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान अंतर्गत शिबिरामध्ये एकूण १६८ रुग्णांची नेत्र तपासणी

आष्टी । प्रतिनिधी

महेश आयुर्वेद हॉस्पिटल, आष्टी येथे मुख्यमंत्री सहाय्यता निधी, धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, धर्मादाय उपआयुक्त कार्यालय बीड तसेच महेश आयुर्वेद कॉलेज व हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान या मोफत नेत्रविकार निदान, उपचार व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते

या शिबिराचे उद्घाटन आष्टी–पाटोदा–शिरूर कासार मतदारसंघाचे नेते, माजी आमदार मा. भीमरावजी धोंडे,मा . श्री.राजेशजी अ.सासने साहेब(धर्मादाय सह आयुक्त लातूर विभाग,लातूर) मा. श्री . प्रदीपजी म.चौधरी साहेब (धर्मादाय उप आयुक्त,बीड) यांच्या हस्ते संपन्न झाले.प्रास्ताविक नेत्रतज्ञ डॉ. चंद्रकांत गोसावी म्हणाले की या अभियानाचा उद्देश ग्रामीण व सामान्य जनतेपर्यंत नेत्रविकारांवरील मोफत व दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचवणे हा आहे. आजारांचे वेळेवर निदान व योग्य उपचार झाल्यास अनेक रुग्णांना नवे जीवन मिळू शकते. महेश आयुर्वेद हॉस्पिटल हे तळागाळातील रुग्णांसाठी सदैव तत्पर असून, या उपक्रमातून समाजहितासाठी मोठी सेवा घडणार आहे. अध्यक्षीय भाषणात मा. आ .भीमरावजी धोंडे साहेब म्हणाले १७ सप्टेंबर २०२५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त या अभियानाची सुरुवात झाली असून, २



ऑक्टोबर महात्मा गांधी जयंतीदिनी समारोप होणार आहे. ग्रामीण व तळागाळातील रुग्णांना मोफत नेत्रतपासणी, औषधे, शस्त्रक्रिया व चष्म्यांचे वाटप हा या अभियानाचा उद्देश आहे.पूरग्रस्त परिस्थिती असूनही जिल्ह्यात असे लोककल्याणकारी कार्यक्रम घेणे अभिमानास्पद आहे. शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टीचा या मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग उल्लेखनीय आहे. प्रत्येक आव्हानाचा मुकाबला करत समाजहिताचे अभियान राबवणे हीच खरी सेवा आहे भविष्यात कॅन्सर हॉस्पिटलसारखी अधिक प्रगत सुविधा उभारण्याचा मानस असून त्याबाबत प्राथमिक चर्चा सुरू आहे. या उपक्रमासाठी घेतलेला पुढाकार कौतुकास्पद आहे. प्रमुख पाहुणे श्री. राजेश ससाने (धर्मादाय सह आयुक्त, लातूर विभाग) म्हणाले –नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान हा समाजातील दुर्बल घटकांसाठी मोठा दिलासा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सुरू झालेले आणि गांधी जयंतीपर्यंत चालणारे हे अभियान हजारो रुग्णांना दृष्टीसंपन्न आयुष्य देणार आहे.

महेश आयुर्वेद हॉस्पिटल ग्रामीण भागात आरोग्यसेवेचे भक्कम केंद्र म्हणून उभे राहत आहे. प्रा. शिवदास विधाते (प्रशासन अधिकारी) यांनी सांगितले हॉस्पिटलमध्ये नेत्रविकारांवरील सर्व सुविधा उपलब्ध असून गरजू रुग्णांना भविष्यातही मोफत किंवा अल्पदरात सेवा पुरवण्याचा आमचा संकल्प आहे. या शिबिरामध्ये एकूण १६८ रुग्णांची नेत्र तपासणी नेत्रतज्ञ डॉ. गोसावी चंद्रकांत यांनी करून उपचार करण्यात आले.या वेळी प्रमुख पाहुण्यांमध्ये श्री. प्रदीपजी चौधरी (धर्मादाय उप आयुक्त, बीड), श्री. सुपकाळ (न्याय विभाग, बीड), श्री. कुंभार (लेखा विभाग, बीड), माजी जि.प. सदस्य रामराव खेडकर, आर.पी.आय तालुका अध्यक्ष अशोक साळवे, ग्रा.पं. सदस्य आदेश निमोनकर, इंजि. एम.एन. बडे, वैजनाथ मिसाळ, संतोष सानप, पत्रकार उत्तमराव बोडखे, प्रवीण पोकळे, शरद रेडेकर , प्रशासन अधिकारी डॉ. डी बी राऊत ,प्रा. शिवदास विधाते ,माऊली बोडखे ,संजय शेंडे ,संदीप नन्नवरे, सागर वाघुले उपस्थित होते तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, हॉस्पिटलचे सर्व कर्मचारी, आनंद संकुलमधील सर्व प्राचार्य, रुग्ण व पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त आदित्य फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थांना मार्गदर्शन

### विद्यार्थ्यांकडून घेतली फार्मासिस्टची शपथ,आरोग्य शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

**जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त आदित्य एज्युकेशन ग्रुपतर्फे आदित्य फार्मसी कॉलेजच्या सभागृहात संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वैद्यकीय क्षेत्रात फार्मासिस्टची भूमिका, औषधांचा नैतिक आणि तर्कसंगत वापर तसेच फार्मसी क्षेत्रातील व्यापक संधी या विषयांवर हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांकडून फार्मासिस्टची शपथ घेण्यात आली. आरोग्य शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.**

विद्यार्थांना मार्गदर्शन करताना बीडचे सहाय्यक आयुक्त डॉ. एम.जे. निमसे म्हणले डॉक्टर हे मानवी जीवनाचे आधारस्तंभ असले तरी फार्मासिस्ट हे असे व्यावसायिक आहेत जे त्या आधारस्तंभाला बळ देतात. औषधांचा नैतिक वापर आणि रुग्णांच्या हिताचा विचार ही



फार्मासिस्टची खरी जबाबदारी आहे. आजच्या काळात फार्मसी क्षेत्राची व्याप्ती रेल्वे बोर्ड, लोकसेवा आयोग तसेच विविध सरळसेवा भरती मंडळांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढली आहे असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे उद्घाटन अन्न व औषध प्रशासन, बीडचे सहाय्यक आयुक्त डॉ. एम.जे. निमसे यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला आदित्य एज्युकेशन ग्रुपचे संचालक डॉ. आदित्य सारडा यांचे विशेष प्रोत्साहन लाभले. औषधनिर्माण संस्थेचे प्राचार्य डॉ. कुमार सुरवसे, आदित्य इंजिनीरिंग कॉलेज चे प्राचार्य डॉ.बहादुरे, प्रशासकीय अधिकारी डॉ. राहुल खडके, आदित्य डी.एड. कॉलेजच्या प्राचार्या बावणे मॅडम यांच्यासह आदींची उपस्थित होती.डॉ. सुरवसे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना फार्मसी पदवीमुळे उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी अचूक रणनीती आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच स्पर्धा परीक्षांसाठी महाविद्यालयात पूरक वर्ग सुरू करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. समीर देशमुख यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना सादर केली. तसेच फार्मासिस्टची शपथही विद्यार्थ्यांकडून घेण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. मोराले यांच्यासह प्राध्यापक मुळे, प्रा. संजय जाधव, प्रा. वाघमोडे, प्रा. पवार, प्रा. खाडे, प्रा. सानप आदींनी परिश्रम घेतले. प्रा. समीर देशमुख यांनी आभार मानले.

## सरपंच बाळासाहेब राख व कुटुंबियांचे धनंजय मुंडे यांनी केले सांत्वन



पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील थेरला गावचे सरपंच बाळासाहेब राख यांचा तरुण मुलगा तथा धनंजय मुंडे यांचे जुने सहकारी अप्पासाहेब राख यांचा पुतण्या आशिष याचे काही दिवसांपूर्वी रस्ते अपघातात दुःखद निधन झाले होते. माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी आज थेरला येथे जाऊन राख कुटुंबियांचे भेटून सांत्वन केले.

आशिष राख या उमद्या तरुणाचा रस्ते अपघातात दुर्दैवाने मृत्यू झाल्याने राख कुटुंबियांवर कोसळलेल्या दुःखात सहभागी होत धनंजय मुंडेयांनी कुटुंबाला धीर देत आधार दिला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ओबीसी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे, विठ्ठल सानप, ड. गोविंदराव फड, सतीश बडे, अविनाश नाईकवाडे यांसह पदाधिकारी तसेच राख कुटुंबीय उपस्थित होते.

## गावकऱ्यांच्या वतीने गुणवंतांचा सत्कार

**माजलगाव । प्रतिनिधी**

**तालुक्यातील मोठेवाडी येथील गुणवंत विद्यार्थी डॉ. रेणुका महादेव खेत्री, डॉ.सचिन विष्णू खेत्री, डॉ.अक्षय लक्ष्मण खेत्री यांनी बी.एच.एम.एस. ही पदवी प्राप्त केली. याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा दि.३ आक्टोंबर शुक्रवार रोजी सत्कार करण्यात आला.**



तालुक्यातील मोठेवाडी येथील संत सावता महाराज मंदिरात नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समता परिषदेचे तालुकाध्यक्ष जगन्नाथ खेत्री हे होते तर डॉ. रामेश्वर जंगले, माजी चेअरमण विश्वनाथ खेत्री, पत्रकार राजाभाऊ पास्टे, माजी सरपंच विष्णु खेत्री, नाथाराव खेत्री, उपसरपंच अंगद खेत्री,भारत खेत्री, सुदर्शन हिवरकर, सुभाष सर्जे, विलास खेत्री, भगवान पवार, गजानन गोंडे,प्रभाकर खेत्री, चक्रधर हिवरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सोमेश्वर हिवरकर यांनी तर आभार लक्ष्मण खेत्री यांनी मानले. मोठेवाडी येथील शेतकरी कुटुंबातील मुलांनी वैद्यकीय क्षेत्रातील पदवी संपादन केली, त्याबद्दल गावकऱ्यांनी त्यांचा नागरी सत्कार केला. या आयोजनात समता परिषदेचे तालुकाध्यक्ष जगन्नाथ खेत्री यांच्यासह गावकऱ्यांचा सहभाग होता, या सत्कार सोहळयात, गावकऱ्यांनी या गुणवंत विद्यार्थ्यांसोबत त्यांचे आई – वडील पालक यांच्यासह त्यांचा सत्कार करुन त्यांच्या शैक्षणिक प्रगतीचेकौतुककेले, आणि त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



## आष्टीची प्राजक्ता माने ही विद्यार्थ्यांनी बनली ग्राम महसूल अधिकारी

आष्टी । प्रतिनिधी

कन्या प्रशाला आष्टी या शाळेची विद्यार्थिनी प्राजक्ता संजय माने ही शालेय जीवना पासुन एक हुशार व अभ्यासु विद्यार्थिनी होती तिची जिद्द होती अधिकारी होण्याची तिने आपले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून पुण्यासारख्या शहरात कॉम्प्युटर इंजिनिअरिंग देखील केली याबरोबर ती स्पर्धा परीक्षा चा अभ्यास करत होती स्पर्धा परीक्षा चा अभ्यास करत असताना ग्राम महसूल अधिकाऱ्याची परीक्षा दिल्यानंतर ती चांगल्या मार्कांने उत्तीर्ण झाली आज पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील शिरसाटवाडी या भागात ग्राम महसूल अधिकारी म्हणून कार्यरत आहे प्राजक्ता संजय माने ही आष्टी शहरातील संजय माने जामखेड येथील लना महाविद्यालयामध्ये ग्रंथपाल म्हणून कार्यरत असणारे संजय माने यांची कन्या आहे शिरसाटवाडी येथील ग्रामस्थांनी तिचा आदरपूर्वक सत्कार करून तिला सन्मानित केले . तिच्या असते महसूल कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले प्राजक्ता संजय माने या यशाबद्दल आमदार सुरेश आण्णा धस माजी आमदार साहेबराव दरेकर नाना तसेच आष्टी नगरपंचायतचे माजी नगराध्यक्ष रंगनाथ आण्णा धोंडे कन्या प्रशाल्याच्या शिक्षिका आशाताई धोंडे व जयश्री काकडे यांनी अभिनंदन केले आहे.

## निसर्गाच्या आघातानंतर 'भारती विद्यापीठा'चा आधार

बीड । प्रतिनिधी

मराठवाड्यात, विशेषतः बीड जिल्ह्यातील गेवराई आणि शिरूर कासार तालुक्यांमध्ये अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. काढणीला आलेले पीक अक्षरशः वाहून गेल्याने आणि लाखो हेक्टर शेतजमीन खरडून गेल्याने शेतकरी पूर्णपणे हवालदिल झाला आहे. अनेक कुटुंबांचे संसार उघड्यावर पडले असून, घरादारातील आवश्यक सामान देखील पुराच्या पाण्यात वाहून गेले आहे.

आ.विश्वजीत कदम साहेब यांचा 'मदतीचा हात'या नैसर्गिक आपत्तीच्या संकटकाळात, माझे अंतिम नेतृत्व माजी मंत्री मा.आमदार विश्वजीत कदम साहेब यांनी तात्काळ मदतीचा हात पुढे करत शेतकऱ्यांना मोठा आधार दिला आहे. त्यांनी स्व. पतंगराव कदम साहेबांच्या 'सेवाभावी' विचारांचा वारसा जपत, आपल्या नेतृत्वाखालील भारती विद्यापीठाच्या माध्यमातून गेवराई,




शिरूरसह मराठवाड्यातील सर्व अतिवृष्टीग्रस्त भागातील गरजू शेतकऱ्यांना जीवनावश्यक साहित्यांची तातडीची मदत पोहोचवली.कठीण प्रसंगी आ. डॉ .विश्वजीत कदम साहेब आणि भारती विद्यापीठाने दिलेली ही साथ, पीडित शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा ठरली आहे.मा. आ. डॉ.विश्वजीत कदम साहेब व भारती विद्यापीठाचे सर्व कर्मचारी यांचे बीड जिल्हा वासियांच्या वतीने मनःपूर्वक आभार.सर्व सेवा कार्यामध्ये बीड जिल्हातील कदम परिवाराचे पाईक अशोक रुस्तुम तिडके सरपंच बोडखा ता. धारूर जिल्हा बीड.

## नगरपरिषद अंबाजोगाईच्या वतीने लोककल्याण मेळाव्याचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजना (पीएम–स्वनिधी) यांची पुनर्रचना करण्यात आली आहे. सदर योजनेला मार्च – २०३० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने अंबाजोगाई शहरातील सर्व स्थिर, फिरता, तात्पुरत्या फेरिवाल्यांना विविध राष्ट्रीयकृत बँकांमार्फत खेळते भांडवल उपलब्ध करून देण्यात येईल अशी माहिती नगरपरिषद अंबाजोगाईच्या मुख्याधिकारी श्रीमती प्रियांका टोंगे यांनी दिली. त्या नगरपरिषद अंबाजोगाईच्या वतीने आयोजित लोककल्याण मेळाव्यात बोलत होत्या.

नगरपरिषद अंबाजोगाईच्या वतीने लोककल्याण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. दीनदयाळ जनआजिविका योजना – शहरी (डिजेएवाय–एस) अंतर्गत प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजना (पीएम–स्वनिधी) या संदर्भात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरपरिषदच्या



**प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेतून खेळते भांडवल मिळणार मुख्याधिकारी श्रीमती प्रियांका टोंगे यांची माहिती**

मुख्याधिकारी श्रीमती प्रियांका टोंगे या होत्या, या प्रसंगी स्वच्छता निरीक्षक अनंत वेडे, तसेच आयसीआयसीआय बँकेचे अधिकारी महेश अंजान, शहर अभियान व्यवस्थापक दिलीप तांबारे, शहर अभियान व्यवस्थापक समीर शेख इत्यादींनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी लोककल्याण मेळाव्यास सिएलएफ, एएलएफचे सर्व पदाधिकारी सदस्य तसेच प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजना (पीएम–स्वनिधी) अंतर्गत लाभ घेतलेले लाभार्थी व महिला बचत गटाच्या सदस्या व कर्मचारी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. सदरील मेळाव्या मध्ये मुख्याधिकारी यांनी मार्गदर्शन करताना शासनाने दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी बँकांनी मोठ्या प्रमाणात सहकार्य करावे तसेच शहरातील फेरीवाल्यांनी (पीएम–स्वनिधी) योजने अंतर्गत घेतलेल्या कर्जाची नियमित परतफेड करावी. आणि बँकेमध्ये आपली पत निर्माण करून अशा शासकीय योजनांचे लाभ शहरातील पात्र लाभार्थींनी घेण्यासाठी पुढे यावे असे आवाहन या प्रसंगी केले. सदरील मेळाव्यामध्ये बँकांमार्फत अनेक लाभार्थींना कर्ज वाटप ही करण्यात आले. शहर अभियान व्यवस्थापक समीर शेख यांनी (पीएम–स्वनिध) योजनेची सविस्तर माहिती दिली व तसेच जास्तीत – जास्त लाभार्थ्यांनी स्वनिधी से सुमृद्धी योजनेचे प्रोफिलिंग करणे बाबत मार्गदर्शन करण्यात आले. दीनदयाळ जनआजिविका योजना–शहरी (डिजेएवाय–एस) योजने अंतर्गत लाभार्थींना घटकनिहाय मिळणारे लाभ यांची सविस्तर माहिती शहर अभियान व्यवस्थापक दिलीप तांबारे यांनी दिली. कार्यक्रम यशस्वितेसाठी मल्हारी जोगदंड, शहर समन्वयक लखन ओहळ, सोनाली शिंदे, शिवाजी जावीर, तसेच शहरस्तर संघाच्या अध्यक्षा श्रीमती रोहिणी कडेकर, सिआरपी निर्गुण हावळे, सीमा खतीब, मनिषा वाघमारे, प्रियांका राऊत यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. तसेच आनंदी, आदिशक्ती, आईसाहेब, प्रगती, त्रिभुवनी, भाव्या, श्री रेणुका इत्यादी स्वयंसहाय्यता महिला बचत गटाच्या सदस्यांची उपस्थिती होती.

## राष्ट्रीय सेवा योजना सप्ताहाचा समारोप

### महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री पुण्यतिथी साजरी

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात आज राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती व लालबहादूर शास्त्री यांची पुण्यतिथी व साजरी करण्यात आली याचबरोबर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने २२ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर रोजी आयोजित केलेल्या राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त कार्यक्रम आयोजन करण्यात आले या सप्ताचा समारोप समारंभ अस संपन्न झाला या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राचार्य विश्वासरावजी कदम त्याचबरोबर राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक लोखंडे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक बापू घोक्षे व्यासपीठावर उपस्थित होते सर्वप्रथम महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेची पूजन करून अभिवादन करण्यात आले मान्यवरांचा सत्कार करण्यात आला यानंतर या कार्यक्रमाची प्रस्ताविक प्राध्यापक लोखंडे यांनी केले त्यांनी आपल्या




मनोगतात राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थापना दिनानिमित्त आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमाचे रूपरेषा विशद केली या सप्ताह माध्यमातून विविध कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. यानंतर प्राध्यापक घाडगे सर प्राचार्य कदम सर यांनी मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे आभार प्राध्यापक बापू घोक्षे यांनी मानले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनिल शिंदे श्री दत्ता चादर यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक उपस्थित होते कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

cmyk

# कापूस उत्पादकता वाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरावे

## कृषी विज्ञान केंद्रातील पीक संरक्षण तज्ञ प्रा.अजय मिटकरी यांचे आवाहन

जालना : कापूस उत्पादकता वाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरण्याची गरज आहे, कीड रोगाचे योग्य निदान करून योग्य वेळी योग्य कीटकनाशकाचा वापर योग्य मात्रेमध्ये करावा व कापूस पिकाचे शेंडे खुडल्यास उत्पादनामध्ये वाढ होईल, असे कृषी विज्ञान केंद्रातील पीक संरक्षण तज्ञ प्रा.अजय मिटकरी यांनी सांगितले. केंद्रीय कापूस संशोधन केंद्र, नागपूर व कृषी विज्ञान केंद्र, खरपुडी जालना यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष कापूस प्रकल्पाअंतर्गत मौजे अंतरवाला येथील प्रगतीशील शेतकरी संताजी भोईटे यांच्या शेतावर कापूस शेती दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी

वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ.एस.व्ही.सोनुने, कृषी उपसंचालक संजय कायंदे, मृदशास्त्रज्ञ प्रा.राहुल चौधरी, कृषी अभियंता पंडित वासरे, सरपंच बळीराम शिंदे, रामेश्वर पाडूळ आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविकात डॉ. एस.व्ही सोनुने यांनी कापूस पिकातील सघन कापूस लागवडीचे महत्त्व सांगत सघन कापूस लागवडीचे नुकसान



पारंपरिक कापूस लागवडीपेक्षा कमी आहे. शेतकऱ्यांसोबत कृषी विज्ञान केंद्र खरपुडी सक्षमपणे उभे आहे, असे सांगितले. प्रा.राहुल चौधरी यांनी खत व्यवस्थापन व फवारणी मार्फत देण्यात येणाऱ्या खतांची माहिती देत नॅनो युरिया बद्दल शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कृषी अभियंता पंडित वासरे यांनी बीबीएफ तंत्रज्ञान तसेच बेडवर पेरणी पावसाच्या दृष्टीने महत्त्वाचे असे सांगितले.

कार्यक्रमात रामेश्वर पडूळ यांनी तरुणांना शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञान वाढवण्याचे आवाहन केले. तसेच त्यांनी शेतकऱ्यांना कृषी विज्ञान केंद्र, खरपुडी इथे नियमित दर ५ तारखेला होणाऱ्या कृषि विज्ञान मंडळाच्या मासिक चर्चासत्रास उपस्थित राहून नवनवीन ज्ञान आत्मसात करावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या शेवटी आंतरवला येथील शेतकरी संताजी मुकुंदा भोईटे यांच्या शेतावरील सघन कापूस लागवड प्रात्यक्षिकास सर्व शेतकऱ्यांसह शास्त्रज्ञांनी भेट दिली. या शेती दिनासाठी परिसरातील पाच गावातील महिलांसह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे कृषी उपसंचालक संजय कायंदे यांनी शेतीमधील तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्याचे आवाहन केले. तसेच शेतकऱ्यांनी कृषी विज्ञान केंद्राच्या सान्निध्यात राहून नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे, ग्रेटेड बंडिंग आणि कंपार्टमेंट बंडिंग वाढत्या पावसाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असल्याचे सांगितले.

# या पद्धतीने करा पिकामध्ये विद्राव्य खताचा वापर



शेतकरी दाणेदार खताबरोबरच विद्राव्य खतांचा वापर आपल्या पिकांमध्ये करत असतात. मात्र कोणते विद्राव्य खत पिकाच्या कोणत्या अवस्थेमध्ये वापरावे याची माहिती असने गरजेचे आहे.

विद्राव्य खत वापरताना घ्यावयाची काळजी : विद्राव्य खताचा वापर करताना २०० लिटर पाणी घ्यावे. ही विद्राव्य खते ड्रीपने द्यायची असल्यास व्हेंचुरीचा वापर करणे आवश्यक आहे. ज्यावेळी पिकाला पाणी द्यायचे बंद करायचे आहे, त्याच्या शेवटच्या १५ मिनिटे आधी पिकाला ड्रीपद्वारे खते सोडावीत. यानंतर पुन्हा ५ ते १० मिनिटे पाणी द्यावे. खते ड्रीपद्वारे द्यायची असल्यास सकाळी ७ ते ९ या वेळेत द्यावी. विद्राव्य खतांचा वापर भरमसाट करू नये. मोजक्या स्वरूपात मात्र वारंवार देण्याचा प्रयत्न करावा. ही खते देताना दोन खतांमधील अंतर ५ ते ६ दिवसांचे असावे. विद्राव्य खते एकमेकांत मिसळू नयेत.

पिकाच्या अवस्थेनुसार द्या खते : १९:१९:१९ : पिकाच्या पहिल्या अवस्थेत म्हणजेच पिकाच्या मुळांची वाढ किंवा शाखीय वाढीसाठी हे विद्राव्य खत पिक लागवडीनंतर २ ते ३ ग्रॅम प्रतिलिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करु शकता. तसेच हे खत ड्रीपद्वारे द्यायचे असल्यास दीड ते दोन किलो प्रतिएकर हे खत वापरावे. पिकाच्या वाढीच्या सुरुवातीच्या अवस्थेत ही खताची ग्रेड वापरली जाते, त्यामुळे या विद्राव्य खताला स्टार्टर ग्रेड असे म्हटले जाते.

१२:६१:०० : पिकवाढीच्या पहिल्या अवस्थेमध्ये १२:६१:०० ही खताची ग्रेड वापरता येते. मुळांच्या वाढीसाठी, फुटव्याची संख्या वाढवण्यासाठी या खताचा वापर केला जातो. हे विद्राव्य खत ड्रीपद्वारे, फवारणीद्वारे किंवा आळवणीद्वारे वापरता येते. ००:५२:३४ : पिकाच्या दुसऱ्या अवस्थेसाठी म्हणजेच फुलोरा अवस्थेसाठी ००:५२:३४ या खताचा वापर करावा. या विद्राव्य खतात स्फुरद आणि पालाशचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे पिकाची फुलोरा अवस्था किंवा फुलोऱ्यानंतरची अवस्थेमध्ये देखील या खताचा वापर करता येतो.

१३:००:४५ : पिकाच्या पक्वता अवस्थेमध्ये म्हणजेच तिसऱ्या अवस्थेमध्ये १३:००:४५ या खताचा वापर करता येतो. अवर्षणग्रस्त भागामध्ये पिकाचा ताण कमी करण्यासाठी हे खत वापरता येते. तसेच पिकाला पक्वता आणण्यासाठी या खताचा उपयोग होतो. ००:००:५० : या विद्राव्य खतामध्ये पालाशबरोबरच गंधकाचे प्रमाण असते. परिपक्वतेच्या अवस्थेत किंवा फळाचा आकार वाढवण्यासाठी हे विद्राव्य खत उत्तम मानले जाते.

# जनावरांना जीवघेणा 'घटसर्प' झाल्यास अशी घ्या काळजी

राज्यात काही भागात सध्या जनावरात घटसर्प आजाराचा प्रसार झाला असून यामुळे जनावरे दगावली आहेत. घटसर्प या आजाराला हेमोरॅजिक सेप्टिसिमिया तसेच डिप्थीरिया या नावाने सुद्धा ओळखतात. वातावरणातील बदलाचा परिणाम हा जनावरांवर देखील पाहवयास मिळतो. पावसाळ्याच्या तोंडावर घटसर्प ह्या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव हा जनावरांमध्ये आढळून येतो. विशेषत: गाई आणि म्हशीमध्येच याची लक्षणे आढळतात. शिवाय हा संसर्गजन्य आजार असल्याने त्याचा फैलावही लवकर होतो. यावर वेळीच उपाय झाला नाही तर जनावरे दगावण्याचाही धोका असतो. त्यामुळे वेळीच लसीकरण करुन घेणे हाच यामधील सर्वोत्तम पर्याय आहे. जाणून घेऊ या आजाराविषयी आणि त्यावर उपचार पद्धती.

घटसर्प रोगाच्या प्रादुर्भावाची कारणे : पावसाचे पाणी साचणाऱ्या ठिकाणी हा आजार अधिक प्रमाणात आढळतो. शिवाय अस्वच्छ असलेल्या ठिकाणी जनावरे बांधली किंवा लांबचा प्रवास किंवा अतिकाम करून थकलेल्या प्राण्यांवर या आजाराचे जीवाणू हल्ला करतात. रोगाचा प्रसार खूप वेगाने होतो. आजारी जनावरांचा चारा, धान्य आणि पाणी यांचे सेवन आणि इतर जनावरे संपर्कात आली तर हा आजार होतोच. तसेच मादी प्राण्याच्या दुधाने त्याचा प्रसार होतो.

घटसर्प आजाराची लक्षणे : जनावरांना तीव्र ताप येतो, सुमारे १०५ ते १०६ डिग्री फॅ. पर्यंत हा ताप जातो. डोळे लाल आणि सुजलेले दिसतात, नाक, डोळे आणि तोंडातून स्त्राव वाहतो. मान, डोके किंवा पुढील पायांच्या दरम्यान सूज येते. श्वास घेताना पुटपुटण्याचा आवाज येतो, श्वास घेण्यास त्रास होऊन गुदमरून जनावरांचा मृत्यू सुद्धा होतो.

घटसर्प आजारावर उपचार : या आजारावर त्वरित उपचार करणे गरजेचे आहे. अन्यथा जनावराचा यामध्ये मृत्यूही होऊ शकतो. घटसर्पची लक्षणे आढळून आल्यास लागलीच पशूवैद्यकीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधून योग्य ती उपाययोजना करावी. जनावरांना दरवर्षी पावसाळयापूर्वी आजाराची लस जवळच्या पशुवैद्यक दवाखान्यात द्यावी. पावसळ्यापूर्वी लसीकरण करणे गरजेचे आहे. जनावरांना घटसर्प आजाराची लक्षणे दिसताच बाधित जनावरांना इतर निरोगी प्राण्यांपासून जनावर वेगळे करावे. आजारी जनावरांना नदी, तलाव, तलाव इत्यादी ठिकाणी पाणी पिऊ देऊ नका. बाधित जनावराच्या आधी निरोगी जनावरांना चारा, धान्य, पाणी इत्यादी द्यावे.



# आंत्रविषार : शेळ्या, मेंढ्यांमधील प्राणघातक आजार

.आंत्रविषार हा जिवाणूजन्य आजार आहे. या आजारात विष तयार झाल्यामुळे आतड्यांच्या दाह होतो. त्यामुळे मृत्यू होतो. ईटीव्ही लस मॉन्सूनपूर्व म्हणजे १५ जूनपर्यंत आणि मॉन्सूननंतर ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यांत दरवर्षी घ्यावी. पावसाळी वातावरणात अचानक बदल होऊन आर्द्रता, दमटपणा वाढतो. या वातावरणामध्ये शेळ्या, मेंढ्यांना आंत्रविषार आजार होतो. हा जिवाणूजन्य आजार आहे. आंत्रविषार आजाराचे जिवाणू जनावरांच्या आतड्यात नियमित वास्तव्यास असतात, परंतु ते कमी प्रमाणात विष तयार करीत असल्याने शेळ्या मेंढयांमध्ये आजार उत्पन्न करू शकत नाही. परंतु जिवाणूला पोषक वातावरण मिळाल्यास रोगकरकांची उत्पत्ती अधिक प्रमाणात होऊन अधिक प्रमाणात विष उत्पन्न होऊन शेळी, मेंढीचा मृत्यू होतो. दोन आठवड्यांपासून ते मोठ्या वयोगटातील शेळ्या, मेंढ्यांना हा आजार होऊ शकतो. परंतु करडांमध्ये याचे प्रमाण जास्त आहे. निरोगी, धष्टपुष्ट कोकरू, करडे यास अधिक प्रमाणात बळी पडतात. बहुतेक वेळा हा आजार अतितीव्र स्वरूपाचा असल्याने लक्षणे लक्षात येण्याअगोदरच बाधित शेळी, मेंढीचा मृत्यू होतो.

आजाराची कारणे : हा आजार जिवाणूमुळे होतो. शेळ्या, मेंढ्यांच्या आहारामध्ये अचानक बदल. आहारात जास्त प्रमाणात पिष्टमय, कार्बोदकयुक्त खाद्य उदा. मका, गहू, ज्वारी इत्यादी खाण्यात येणे. पावसाळ्यात उगवलेले हिरवे गवत खूप प्रमाणात जनावरांनी खाल्ले, तर या आजाराचा प्रादुर्भाव होऊ शकतो. हिरवा चारा अधिक प्रमाणात खाल्ल्यामुळे जनावरांचे पोट गच्च होते. अंशतः पचलेल्या अन्नामुळे आतड्यांमध्ये जिवाणूद्वारे



अधिक प्रमाणात विष तयार होते.

आतड्यात मोठ्या प्रमाणात न पचलेले किंवा अंशतः पचलेले अन्न असणे. आतड्यामध्ये पट्टकृमीचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव. प्रतिकारशक्तीचा नैसर्गिक अभाव. लहान कोकरू, करडांना जास्त दूध पाजणे.

असा होतो आजार : बहुतेक शेळ्या-मेंढ्यांच्या आतड्यात क्लॉस्ट्रिडियम परफ्रिंजन्स हा जिवाणू कमी प्रमाणात नैसर्गिकरीत्या आढळून येतो. परंतु जिवाणू विष तयार करून बाधा करत नाही. जेव्हा या जिवाणूला पूरक वातावरण मिळते तेव्हा विष तयार करून जनावराला बाधा करू शकतात. आहारातील काही बदल उदा. जास्त प्रमाणात कार्बोदके युक्त खाद्य उदा. मका, गहू, ज्वारी इ. खाण्यात येणे, आतड्यात अडथडे निर्माण झाल्यास जास्त प्रमाणात न पचलेले किंवा अंशतः पचलेले अन्न जमा होणे, तसेच खूप जास्त प्रमाणात वेगाने आहार वाढला तर या जिवाणूला पूरक परिस्थिती निर्माण होते. या परिस्थितीत जिवाणूची वेगाने वाढ होते, ते शक्तिशाली विष तयार करतात. हे विष आतड्यांमधून शोषले जाते. काही तासांतच शेळ्या, मेंढ्यांचा मृत्यू होऊ शकतो.आजाराची लक्षणे : शेळ्या, मेंढ्यांचा मृत्यू अचानक होतो. प्रादुर्भाव झाल्यापासून १२ ते २४ तासांत करडांचा मृत्यू होतो. करडांना हिरव्या रंगाची पातळ हगवण होते. जिवाणूच्या विषांमुळे जनावरांच्या आतड्यांच्या दाह होतो. यामुळे हगवणीतून रक्त पडते. बाहेरून चारून आलेली जनावरे अचानक सुस्त होतात. हालचाल कमी करतात. बाधित पिले हवेत उडी मारून जमिनीवर पडतात, अडखळत चालतात, जनावरांचा तोल जातो. मोठ्या शेळ्या-मेंढ्यांच्या तोंडातून फेस येणे, लाळ येणे, दात खाणे, श्वासोच्छ्वासास त्रास होतो. आजाराच्या शेवटच्या टप्प्यात पोटफुगी, हगवण ही लक्षणे प्रामुख्याने आढळून येतात.

आजाराचे निदान – लक्षणावरून निदान करता येते. मृत्यूनंतर जर त्वरित शवविच्छेदन करण्यात आले, तर प्रामुख्याने हृदयाच्या थैलीमध्ये (पेरीकार्डियल सॅक) द्रव पदार्थांत वाढ झालेली असते. तसेच फायब्रिनच्या गुठळ्या दिसून येतात. फुफ्फुसातील रक्तसंचय आणि द्रवपदार्थात वाढ झालेली दिसते. फुफ्फुसांमध्ये फेस दिसतो. मूत्रपिंडाच्या उती द्रवाने भरतात. मूत्रपिंड मऊ होऊन वेगाने सडण्याची प्रक्रिया चालू होते. उपचार : आजार अल्पमुदत आणि अतितीव्र स्वरूपाचा असल्यामुळे प्रभावी उपचार पद्धतीचा अवलंब करणे शक्य होत नाही. आजाराची लक्षणे दिसल्यास त्वरित पशुवैद्यकांच्या सल्ल्याने औषधोपचार करावे.प्रतिबंधात्मक उपाय : ईटीव्ही लस मॉन्सूनपूर्व म्हणजे १५ जूनपर्यंत आणि मॉन्सूननंतर ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यांत दरवर्षी घ्यावी. तीन महिन्यांवरील कोकरे आणि करडांना आंत्रविषाराची लस द्यावी. पशुवैद्यकाकडून गाभण शेळ्या, मेंढ्यांना आंत्रविषार लसीकरण करून घ्यावे. जनावरांना कोवळे, लुसलुशीत हिरवे गवत जास्त प्रमाणात खाऊ घालू नये. लहान करडांना, कोकरांना गरजेपेक्षा जास्त दूध पाजू नये. शेळ्या मेंढयांना अति कर्बोदके व पिष्टमय पदार्थ युक्त खाद्य (ज्वारी, मका, इ.) जास्त प्रमाणात खाऊ घालू नये. मेलेल्या शेळ्या, मेंढ्यांचे पशुवैद्यकाकडून त्वरित शवविच्छेदन करून घ्यावे. आंत्रविषार या आजाराने मरण पावल्या असल्यास उर्वरित शेळ्या, मेंढ्यांना आंत्रविषार प्रतिबंधात्मक लसीकरण करावे, प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात.

## दिन विशेष

### जागतिक दिवस:
### भारतीय संस्कृत दिन
### शिक्षक दिन–भारत

### महत्वाच्या घटना

१९३२ : फ्रेन्च अपर व्होल्टा या प्रांताचे विभाजन करुन आयव्हरी कोस्ट, फ्रेन्च सुदान आणि नायगर असे देश निर्माण करण्यात आले.
१९४१ : इस्टोनिया हा प्रांत नाझी जर्मनीने ताब्यात घेतला.
१९६७ : ह. वि. पाटसकर पुणे विद्यापीठाचे सातवे कुलगुरू झाले.
१९७७ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाने बाह्य सौरमालेचा अभ्यास करण्यासाठी व्हॉएजर १ या उपग्रहाचे पृथ्वीवरून उड्डाण केले
१९८४ : एसटीएस –४१–डी ही नासाच्या स्पेस शटल प्रोग्रामची १२ वी फ्लाइट आणि स्पेस शटल डिस्कवरीचे पहिले मिशन होते. हे डिस्कव्हरी यान आपली पहिली अंतराळ यात्रा पूर्ण करून कॅलिफोर्नियामधील एडवर्ड्स एअर फोर्स बेस येथे दाखल झाले.
२००० : ज्येष्ठ दिग्दर्शक हृषीकेश मुकर्जी यांना 'दादासाहेब फाळके' पुरस्कार जाहीर
२००५ : इंडोनेशियातील सुमात्रा येथे मंडाला एअरलाइन्सचे 'फ्लाईट ०९१' हे उड्डाण दाट लोकवस्तीच्या भागात कोसळुन विमानातील१०४ आणि जमिनीवरील ३९ लोक ठार झाले.
२०१२ : स्पेनमध्ये टेलिव्हिजनवर बंदी घालण्यात आलेल्या थेट बुलफाईटिंगच्या प्रसारणावर सहा वर्षाची बंदी उठवण्यात आली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

११८७ : लुई (आठवा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: ८ नोव्हेंबर १२२६)
१६३८ : लुई (चौदावा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: १ सप्टेंबर १७१५)
१८७२ : भारतीय स्वातंत्र्य सेनानी आणि तामिळनाडू राज्यातील भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेता व लोकमान्य टिळक यांचे शिष्य वी. ओ. चिदंबरम पिल्लै यांचा जन्मदिन.
१८८८ : डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन भारताचे दुसरे राष्ट्रपती, पहिले उपराष्ट्रपती आणि तत्त्वज्ञ, त्यांच्या गौरवार्थ त्यांचा जन्मदिन हा भारतात 'शिक्षक दिन' म्हणून ओळखला जातो. (मृत्यू: १७ एप्रिल १९७५)
१८९५ : अनंत काकबा प्रियोळकर भाषा व इतिहास संशोधक, लेखक, संपादक व समीक्षक. त्यांनी संपादित केलेल्या विविध ग्रंथात रघुनाथपंडित कृत 'दमयंती स्वयंवर' व मुक्तेश्वरकृत 'महाभारताचे आदिपर्व' हे उल्लेखनीय आहेत. (मृत्यू: १३ एप्रिल १९७३)
१९०५ : प्रसिद्ध भारतीय उपन्यासकार, कथाकार व संपादक वाचस्पती पाठक यांचा जन्मदिन.
१९०७ : जयंत पांडुरंग तथा 'जे. पी.' नाईक शिक्षणतज्ञ, 'इंडियन इन्स्टिट्युट ऑफ एज्युकेशन'चे संस्थापक, 'नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग'चे संस्थापक, भारतामध्ये प्रथमच स्थापन केल्या गेलेल्या शैक्षणिक आयोगाचे सभासद सचिव (मृत्यू: ३० ऑगस्ट १९८१)
१९२० : लीला पोतदार तथा लीलावती भागवत बालसाहित्यिका. ओघवती भाषा, चित्रमय वर्णन व बोलकी संवादशैली ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या 'स्वर्गाची सहल आणि इतर कहाण्या' या पुस्तकाचा 'नॅशनल बुक ट्रस्ट'ने ११ भाषांत अनुवाद प्रसिद्ध केला. (मृत्यू: २५ नोव्हेंबर २०१३)
१९२८ : दमयंती जोशी सुप्रसिद्ध कथ्थक नृत्यांगना (मृत्यू: १९ सप्टेंबर २००४)
१९३३ : आंतरराष्ट्रीय स्तरावर शांतता प्रस्थापित करण्यासाठी 'रॅमन मॅग्सेसे पुरस्कार' ने सन्मानित करण्यात आलेले भारतीय नौदलाचे माजी सेवानिवृत्त प्रमुख अधिकारी व लोकपाल लक्ष्मीनारायण रामदास यांचा जन्मदिन.
१९४० : रॅक्वेल वेल्श अमेरिकन अभिनेत्री
१९५४ : वेस्ट इंडिजचा क्रिकेट खेळाडू रिचर्ड ऑस्टिन यांचा जन्म.
१९४६ : मूळ भारतीय वंशाचा ब्रिटीश गायक व संगीतकार फ्रेडी मर्क्युरी यांचा जन्म.
१९८६ : भारतीय क्रिकेटपटू प्रज्ञान ओझा यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०६ : लुडविग बोल्टझमन ऑस्ट्रियन भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: २० फेब्रुवारी १८४४)
१९१८ : सर रतनजी जमसेटजी टाटा टाटा घराण्यातील उद्योगपती व दानशूर व्यक्ति (जन्म: २० जानेवारी १८७१)
१९७८ : रघुनाथ रामचंद्र तथा रॉय किणीकर कवी, संवादलेखक, नाटककार व पत्रकार. 'रात्र' आणि 'उत्तररात्र' हे त्यांचे कवितासंग्रह विशेष गाजले. मुंबई आकाशवाणीवरील 'वार्यावरची वरात' व 'मेघदूत' या श्राव्य नियतकालिकांचे ते निर्माते व लेखक होते. (जन्म: ? ? १९०८)
१९८६ : अशोक चक्र पुरस्कार सन्मानित भारतीय महान वैमानिक नीरजा भनोट यांचे निधन.
१९८६ : साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय शिक्षणतज्ञ व हिंदी साहित्यिक अंबिका प्रसाद दिव्य यांचे निधन.
१९९१ : शरद जोशी पद्मश्री पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय हिंदी कवी, लेखक, व्यंगचित्रकार आणि हिंदी चित्रपट आणि दूरदर्शन मालिका संवाद आणि पटकथा लेखक (जन्म: २१ मे १९३१)
१९९२ : अतूर संगतानी उद्योगपती व दानशूर व्यक्ति (जन्म:)
१९९५ : सलील चौधरी हिंदी व बंगाली चित्रपटसृष्टीतील संगीतकार (जन्म: १९ नोव्हेंबर १९२२ चिंगरीपोथा, २४ परगणा, पश्चिम बंगाल)
१९९६ : भारतीय बिशप बॅसिल सालदवदोर डिसोझा यांचे निधन. (जन्म: २३ मे १९२६)
१९९७ : मदर तेरेसा शांततेचा नोबल पारितोषिक आणि भारतातील सर्वोच्च नागरिक पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध समाजसेविका, व कॅथोलिक चर्चच्या धर्मगुरू (जन्म: २६ ऑगस्ट १९१०)
२००० : रॉय फ्रेड्रिक्स वेस्ट इंडिजचा क्रिकेटपटू (जन्म: ११ नोव्हेंबर १९४२)
२०१५ : भारतीय गायक-गीतकार आदेश श्रीवास्तव यांचे निधन. (जन्म: ५ सप्टेंबर २०१५)



राज्य लोकतंत्र मराठवाडा वृत्तांत
रविवार दि.५ ऑक्टोबर २०२५ ५



# दिवाळीनंतर वाजणार निवडणुकांचा बिगूल!

छत्रपती संभाजीनगर: प्रतिनिधी

राज्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या नगराध्यक्षपदाच्या आरक्षणाची सोडत सोमवार, दि. ६ ऑक्टोबरला मुंबईत काढली जाणार आहे. राज्यातील सर्व राजकीय पक्षांना पत्र पाठवून या सोडतीची माहिती नगर विकास विभागाच्या उपसचिव प्रियंका कुलकर्णी-छापवाले यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली. मार्च २०२२ पासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासकराज आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जानेवारीअखेर घेतल्या जाणार आहेत. राज्य निवडणूक आयोगाने तसे नियोजन केले आहे.

राज्यातील २४७ नगरपरिषदा आणि १४७ नगरपंचायतींच्या नगराध्यक्षपदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी ही सोडत प्रक्रिया राबवली जाणार आहे. ही सोडत मुंबईतील मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावरील परिषद सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.दोन टप्प्यात होणा-या निवडणुकांमध्ये पहिला टप्पा जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या किंवा नगरपालिका-नगरपरिषदांचा असणार आहे. दिवाळीत या निवडणुकांचा बिगुल वाजेल, अशी माहिती निवडणूक आयोगातील विश्वनिय सूत्रांनी दिली.विधानसभा निवडणुकीनंतर आता राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत यश मिळविण्यासाठी प्रत्येक पक्ष आपापल्या परीने प्रयत्न करीत आहेत.



**जि. प., पं. स, मनपा नगर परिषदांच्या निवडणुका**

जिल्हा परिषदा : ३२
पंचायत समित्या : ३३१
महापालिका : २९
नगरपालिका आणि नगरपरिषदा : २८९

सध्या नगरपालिका नगरपरिषदांच्या मतदारयाद्यांचा कार्यक्रम जाहीर झाला. त्यानंतर आरक्षण काढले जाईल. दरम्यान, जिल्हा परिषदांच्या आरक्षणाचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यामुळे पहिल्या टप्प्यात या निवडणुका होऊ शकतात, असे सूत्रांचे म्हणणे आहे.

दरम्यान, मंत्रालयातील सुरक्षा व्यवस्थेच्या कारणास्तव प्रत्येक राजकीय पक्षाला दोन प्रतिनिधींना या सोडतीसाठी पाठवण्याची विनंती शासनाने केली आहे. दिवाळीत पहिल्या टप्प्यातील निवडणुकांचा बिगुल वाजणार आहे. निवडणुकीसाठी उपलब्ध मनुष्यबळ, ईव्हीएम या बाबींचा अंदाज घेऊन निवडणुकींचा कार्यक्रम तयार केला जाईल, असे वरिष्ठ अधिका-यांनी सांगितले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राज्यभरात ९ कोटी ८० लाख मतदार आहेत. या निवडणुकांच्या निकालावरून राज्यातील राजकीय पक्षांचे भविष्य ठरणार आहे. त्यामुळे या निवडणुका जिंकण्यासाठी सर्व पक्षांनी कंबर कसली आहे.

## नगराध्यक्षांची निवड जनतेतूनच होणार

नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायतींच्या नगराध्यक्षांची निवड जनतेतूनच होणार आहे. नगराध्यक्षांच्या आरक्षणाची सोडत सरकारच्या वतीने काढली जाणार आहे. राज्यात २०१९ नंतर सत्ता बदल झाल्यावर नगराध्यक्षांची निवड बहुमताने केली जात होती. आता त्यात पुन्हा बदल करण्यात आला असून स्थानिक स्वराज्य संस्थांचे नगराध्यक्ष जनतेतूनच निवडले जाणार आहेत.

## बाधित शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी मोफत बी-बियाणांचे वाटप करा-किसनराव मोरे

मंठा। प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी मोफत बी - बियाणांचे वाटप करा अशी मागणी बाजार समितीचे माजी उपसभापती तथा पंचायत समिती सदस्य किसनराव मोरे यांनी केली आहे.

या संदर्भात जिल्हाधिकारी जालना आणि जिल्हा कृषी अधीक्षक यांना निवेदन पाठविण्यात आले असून मंठा तालुक्यात यावर्षी अतिवृष्टीमुळे खरीप हंगामातील पिकांचे सर्वाधिक नुकसान झाले. आर्थिक परिस्थितीने हताश झालेल्या शेतकऱ्यांना मदतीची अत्यंत गरज आहे. मंठा तालुक्यातील जयपूर सर्कलसह सर्वच गावांना अतिवृष्टीचा मोठा फटका बसला. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून नेला. या संकटातून शेतकरी अद्यापही सावरला नाही लगेच रब्बी हंगामातील पेरणीची तयारी शेतकऱ्यांना करावी लागणार आहे. मंठा तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांना गहू, हरभरा, करडी या रब्बी पिकांसाठी बी - बियाणांचे मोफत वाटप करावे अशी मागणी किसनराव मोरे यांनी केली आहे.

## आर्यन बिंगी याची चेन्नई अखिल भारतीय विद्यापीठ राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

जालना। प्रतिनिधी

जालना येथील बारवाले महाविद्यालयात प्रथम वर्षात शिक्षण घेत असलेला आर्यन गोपाल बिंगी याने उत्तुंग यश संपादन करत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ द्वारा आयोजित दगडोजीराव देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात पार पडलेल्या आंतर महाविद्यालयीन योगासन स्पर्धेत आर्यन ने उत्कृष्ट कामगिरी करून एकूण २५ जनावर मात करीत अत्यंत अटीतटी च्या लढतीत द्वितीय क्रमांक प्राप्त पटकावला.

या भरीव कामगिरीच्या जोरावर आर्यनची नोव्हेंबर २०२५ मध्ये चेन्नई येथे होणाऱ्या राष्ट्रीय अखिल भारतीय आंतर विद्यापीठ योगासन स्पर्धेसाठी निवड झाली आहे या स्पर्धेत संपूर्ण भारतातील जवळपास २५० विद्यापीठातील ५००० खेळाडू सहभागी होतील या यशामुळे आर्यन



बिंगी याचे सर्वत्र कौतुक होत आहे. या यशामागे बारवाले महाविद्यालयाचे अध्यक्ष, मॅनेजमेंट मधील सर्व सहकारी प्राचार्य, शारिरीक शिक्षण विभाग प्रमुख व क्रीडा संचालक डॉ भिकूलाल सले यांचे मार्गदर्शन तसेच वडील गोपाल बिंगी यांचे मोलाचे प्रोत्साहन लाभले आहे.

## दांडिया, गरबा, भोंडला स्पर्धांना महिलांचा उदंड प्रतिसाद

### नवरात्रानिमित्त शहरात विविध उपक्रमांची धूम

अहिल्यानगर

अहिल्यानगर शहरात यंदा दांडिया व गरबा उत्सवाला तरुणाईसह महिलांचा उदंड प्रतिसाद मिळाला. संपूर्ण शहरात उत्साहाचे वातावरण होते. विविध संघटना, क्लब आणि महाविद्यालयांत दांडिया आणि गरबा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांनी पारंपरिक भारतीय संस्कृतीचा वसा जोपासला. विशेष म्हणजे यंदा तरुणाईचा व महिलावर्गाचा उदंड प्रतिसाद लाभला. मध्यवर्ती शहरासह केडगाव, बुरुडगाव, भिंगार, सावेडी उपनगर, बोल्हेगाव, पाइपलाइन रोड व तपोवन परिसर, तुळजाभवानी मंदिर परिसर, खासगी लॉन्स आणि शहराच्या विविध गार्डन्समध्ये हे कार्यक्रम आयोजित केले होते. गरब्याच्या रंगीबेरंगी प्रकाशांत रात्रीचे आकाश उजळून निघाले. विविध क्लब्स व संस्थांनी या कार्यक्रमांमध्ये लोकांसाठी खुले आमंत्रण दिले होते, ज्यामुळे कार्यक्रमात भरपूर गर्दी जमली. जय तुळजाभवानी माता मंदिर, झारेकर गल्ली यांच्यावतीने महिलांसाठी विशेष 'खेळ पैठणी' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याला महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

विविध खेळ, विनोदी प्रश्नोत्तरांची मालिका आणि महिलांना सतत सहभागी करुन घेतले. पेमराज सारडा महाविद्यालयात भोंडला आणि गरबा पार पडला. यात परंपरा आणि उत्साहाचा अनोखा संगम दिसून आला. या उत्सवाने महाविद्यालय परिसर नृत्याच्या तालावर आणि पारंपरिक गाण्यांनी काही काळ मंत्रमुग्ध करुन टाकला. महिलांच्या कलागुणांना वाव शहरात आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमांत महिलांसाठी खास मंच तयार केले होते. त्यामुळे त्यांच्या कलागुणांना वाव मिळाला. महिलांना त्यांच्या आवडीच्या नृत्यप्रकारात सहभागी होण्याची संधी मिळाली. पारंपारिक नृत्यांच्या तालावर त्यांनी ठेका धरला. सांस्कृतिक वारसा जपला दांडिया आणि गरबा उत्सवाने एकत्रितपणे सांस्कृतिक वारसा जपत महिलांना त्यांच्या कलागुणांचा व्यासपीठ उपलब्ध करुन दिले. यात सहभाग घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने या उत्सवाचा दिलखुलास आनंद घेतला आणि समाजात प्रेम, एकता आणि सांस्कृतिक समृद्धतेचा संदेश दिला. सामाजिक एकतेचा संदेश दांडिया व गरबाचे पारंपरिक नृत्य हे केवळ आनंदाचा स्रोत नसून, ते संस्कृतीच्या रक्षणाचे आणि वृद्धीचे प्रतीक ठरले. आयोजकांनी या कार्यक्रमांमध्ये समाजिक एकता व समावेशकतेला प्रोत्साहन दिले. विविध वयोगट व समुदायांतील महिलांनी एकत्र येऊन पारंपरिक नृत्यांचा आनंद घेतला. आनंदनगर परिसरात भोंडल्याचा पारंपरिक उत्सवात सहभागी झालेल्या महिला होत्या.

जाहिर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ५१४/२०२५**
**साहेबराव गणपतराव वाहुळे विरुद्ध**
**मुख्य नगर परिषद बीड**

पहा
साहेबराव गणपतराव वाहुळे रा. मित्र नगर ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्मधारक स्वाती साहेबराव वाहुळे यांचा दिनांक २८/०२/१९९५ रोजी जन्म झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस न.प.बीड ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय न.प.बीड ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक २६/०९/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २६/१०/२०२५ ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

## ६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा

अंबड। प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा अंबड तालुका अंबड शहरातील मुख्य चौकातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ ६९ वा धम्मचक्रप्रवर्तन दिन भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला.प्रथम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून,त्यानी दिलेल्या धम्मदिक्षा समारंभावर प्रकाश टाकणारी विविध वक्त्यांची भाषणे यावेळी झाली.कार्यक्रमास मोठ्या संख्येने मान्यवर बौद्ध उपासक उपासिका उपस्थित होते.

तालुकाअध्यक्ष आयु.उत्तमरावं येडे , जिल्हाउपाध्यक्ष आयु.शिवाजीराव गाडेकर, तालुका सरचिटणीस आयु. डॉ.राहुल बागुल, संघटक आयु.चंद्रकांतजी दिलपाक *सर ,प्राचार्य आयु.सुधाकरजी घायतडक सर , प्रा.प्रकाशजी घायतडक सर ,



डॉ.काकासाहेब गाडेकर, प्रा.भिंगारदेव सर,भागवत चाबुकस्वार सर , रामदासजी वाढवे , मनोजभाऊ साळवे, मनोहर पटेकर, मधुकर म्हस्के, प्रा.गवळे राहुल,. आयु. विजय ससाने , रमेशजी म्हस्के सर, सुरेश तुपे, आयु.मिलिंद येटाळे, गंगाधरजी घायतडक, आयु.शाम तुपे, विश्वनाथ पोटफोडे, आयु.भावनाताई दिलपाक, आयु. राधाताई खरात, सुनिताताई घायतडक,आयु.छायाताई घायतडक,आयु.सुजाताताई येडे, देऊबाई ससाने,वर्षाताई खरात,शारदाताई म्हस्के,स्नेहलताई येडे.जयश्रीताई घायतडक आणि इतर मान्यवर उपस्थित होते.शेवटी सरणतय घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. त्यानंतर जगताप गायनपार्टी यांचा भिमगीताचा कार्यक्रम संपन्न झाला.

## मोबाईलमध्ये कपास किसान ॲप डाऊनलोड करून कापूस ऑनलाईन नोंदणी करावी -रमेश बोराडे

मंठा। प्रतिनिधी

भारतीय कपास निगम लि. (सीसीआय) द्वारा नजीकच्या काळात कापूस खरेदी कृषी उत्पन्न बाजार समिती मंठा अंतर्गत सुरू होणार असून तालुक्यातील शेतकरी बांधवांनी स्वतःच्या मोबाईलवर रजिस्ट्रेशनकरिता कपास किसान ॲप डाउनलोड करावे असे आवाहन बाजार समितीचे सचिव रमेश बोराडे व संचालक मंडळाचेवतीने करण्यात आले आहे.

मोबाईल प्ले स्टोअरवरून कपास किसान हे ॲप्लीकेशन सर्वप्रथम डाऊनलोड करून घ्यावे त्यानंतर रजिस्ट्रेशन करिता आपल्या शेतीची कागदपत्रे जवळ ठेवावी. उदा. अद्यावत सातबारा उतारा चालू वर्षाचा पीकपेरा, आधार कार्ड, स्वतःचा मोबाईल क्रमांक, बँकेचे पासबुक कपास किसान या ॲपमध्ये विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे व माहिती क्रमवार भरावी. वरील प्रक्रिया स्वतः शेतकरी बांधवांना स्वतःचे मोबाईल वरून करणे आवश्यक आहे. तरी सर्व कापूस उत्पादक शेतकरी बांधवांनी याची नोंद घेऊन १ सप्टेंबर २०२५ ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत आपली नोंदणी करून घ्यावी, काही मदत हवी असल्यास कृषी उत्पन्न बाजार समिती मंठा या कार्यालयात संपर्क साधावा असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव रमेश बोराडे व सर्व संचालक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

**मा.श्री. आर.एस.ए.शेख, सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांकः ६१८/२०२५**
**(मार्फत विधिज्ञः ॲड जी एस घुगे)**

अर्जदार :-१. लिंबा पि. नाना उर्फ नानाभाउ जाधव, वय ६५ वर्षे, धंदा शेती, रा. मोनगीरवाडी, पो. बोरफडी, ता. जि. बीड

२. संदिपान पि. नाना उर्फ नानाभाउ जाधव, वय ६३ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.,३. बलभिम पि. नाना उर्फ नानाभाउ जाधव, वय ६२ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे, ४. शाहु पि. नाना उर्फ नानाभाउ जाधव, वय ६० वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरुध्द निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी मयत नामे नाना उर्फ नानाभाउ पि. लहाणु जाधव हे दिनांक २२/०२/२००७ रोजी राहते घरी मोनगीरवाडी, पो.बोरफडी, ता.जि.बीड येथे मयत झालेले असुन अर्जदार क्र १ ते ४ मयताचे मुले आहेत. अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायाल अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यां मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. आज दिनांकः- ०४/१०/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. पुढील तारीखः- ०४/११/२०२५

आदेशावरुन
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

## अतिक्रमणे नियमानुकूलची कार्यवाही जलदगतीने पूर्ण करा

### महाविकास आघाडीच्या उपविभागीय अधिकारी यांना निवेदन

अंबड। प्रतिनिधी

शासन निर्णयानुसार शासकीय जमिनीवर बसलेल्या वस्त्यांना नियमानुकूल करुन पी.टी.आर कार्ड व पंतप्रधान आवास योजनेचा लाभ तत्काळ देण्यात यावे यासाठी ०३ ऑक्टोबर रोजी खा.डॉ.कल्याण काळे,माजी मंत्री राजेश टोपे व मा.भास्कर आंबेकर यांनी अंबड शहरातील गरजूंना घरकुल मिळण्यासाठी अतिक्रमणे नियमानुकूलची कार्यवाही जलदगतीने पूर्ण करण्याबाबत उपविभागीय अधिकारी यांना महाविकास आघाडीच्या वतीने निवेदन देण्यात आले. महाविकास आघाडीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सरकारने सन २०२२ पर्यंत सर्व बेघर कुटुंबांना घर देण्याची महत्वाकांक्षी मोहिम हाती घेतली असून याकरीता केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना राज्यातील ३८२ शहरे व त्यालगतच्या नियोजन क्षेत्रामध्ये राबविण्यास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत शहरी भागात लाभार्थ्यांची निवड स्वतःच्या मालकी हक्काची जागा व वार्षिक उत्पन्न या निकषाच्या आधारे केली जाते व मान्य केलेल्या कृती आराखड्याची अंमलबजावणी



कार्यान्वयीन यंत्रणेमार्फत केली जाते. तथापि,ज्या पात्र लाभार्थ्यास स्वतःची जागा नाही अथवा असा पात्र लाभार्थी महसूल विभागाच्या अखत्यारित असलेल्या कोणत्याही प्रकारच्या शासकीय जमिनीवर अतिक्रमणदार आहे, अशा लाभार्थ्यास जर त्याला स्वतःचे घर बांधावयाचे झाल्यास, त्याला अन्य पर्याय नसतो व त्यामुळे त्याला, अशी सरकारी जमीन उपलब्ध करुन दिल्यास, या योजनेची अंमलबजावणी तातडीने होण्यास मदत होणार आहे.

मा. मंत्रिमंडळाने दिनांक १३ नोव्हेंबर २०१८ च्या बैठकीत राज्यातील महसूल विभागाच्या अखत्यारितील सर्व प्रकारच्या शासकीय जमिनींवर निवासी प्रयोजनासाठी अतिक्रमण केलेल्या आणि प्रधानमंत्री आवास योजनेसाठी पात्र असलेल्या अतिक्रमणधारकांना या योजनेचा लाभ मिळावा यासाठी अशा शासकीय (महसूल विभाग, नगरपरिषद अथवा अन्यविभागाच्या ) जमिनींवरील त्यांची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे.सदरील शासन निर्णयानुसार राज्यातील ३८२ व लगतच्या नियोजन क्षेत्रामधील नागरीकांना त्यांच्या शासकीय जमिनीवर असलेल्या घरांना पीटीआर कार्ड,मालकी हक्क प्रमाणपत्र देऊन पंतप्रधान आवास योजना व रमाई आवास योजनेचा लाभ संबंधीत लाभधारकांना लाभ देण्याचे काम सुरु आहे.याअनुशंगाने नगरपरिषद,अंबड जि.जालना कार्यक्षेत्रातील अनेक गोर-गरीब कुटुंबे अनेक वर्षापासून पक्के घरापासून वंचित आहेत.अंबड नगरपरिषद हद्दीतील अनेक वस्त्या या शासकीय जागेवर बसलेल्या आहेत.या वस्त्यामध्ये अंबड नगरपरिषदेच्या माध्यमातून या नागरीकांना पाणीपुरवठा विभागाने नळजोडणी,महावितरण कंपनीने वीजजोडणी तसेच नगरपरिषदेच्या विविध योजनेतंर्गत या वस्त्यांमध्ये विकास कामे करण्यात आलेली आहेत.परंतु सदरील घरांचे अंबड नगरपरिषदने व भुमिअभिलेख कार्यालयाने नियमानुकूल न केल्याने आज पर्यंत या कुटुंबांना पक्के घरापासून वंचित राहवे लागत आहे.परंतु अंबड नगरपरिषदेने आजपर्यंत अंबड शहरातील लाभार्थी नागरीकांना लाभ देण्याचे कार्य हेतुपरस्पर सुरु केलेले नाही हे अत्यंत अन्याय कारक आहे. अंबड नगरपरिषद कार्यक्षेत्रातील संपूर्ण शासकीय जमिनीवर,निमशासकीय जमिनीवर,खाजगी जमिनीवर निर्माण झालेल्या वस्त्यांचे तात्काळ नियमानुकुल करुन सदरील कुटुंबांना मालकी हक्क प्रदान करत प्रधानमंत्री आवास योजना व रमाई आवास योजनेचा लाभ देवून पक्के घर उभारण्याचे काम तात्काळ करण्यात यावे अशी निवेदनात महाविकास आघाडीने मागणी केलेली आहे. यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, शिवसेना जिल्हाप्रमुख भास्कर आंबेकर,राजेंद्र राख, सतीश होंडे, डॉ. भागवतराव कटारे, चंद्रकांत दिलपाक, विष्णू शेळके, हनुमान धांडे,दिनेश काकडे, समद बागवान, कुमार रूपवते, शिवप्रसाद चांगले, अफरोज पठाण, अर्जुन भोजने, जाकेरभाई डावरगावकर,ॲड.कृष्णा शर्मा, रवी डोंगरे, जितेंद्र बुरले, प्रकाश नारायणकर, मोशीन हाश्मी, सलीम बागवान, नाजा हाश्मी,मोईन शेख, रवी इंगळे, जनार्दन खरात, रमेश वराडे अमोल लहाने गौतम ढवळे, अंकुश झाडे,पाशाभाई,सुरज गुढे,संभाजी गुढे ,आकाश नामदे, नरेंद्र वाघुंडे, मुनाफ कुरेशी,जावेद कुरेशी, महेंद्र गायकवाड, रोहन चौधरी,बाळू काका सोळुंके, रतन तारडे, रशीदभाई मोमीन,बाबासाहेब घोलप,रावसाहेब वाळवे टेलर यांच्यासह महाविकास आघाडीचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# यश ढाका हत्याप्रकरणातील सर्व आरोपींना कठोर शिक्षेसाठी प्रयत्न करणार - धनंजय मुंडे

**बीड | प्रतिनिधी**

बीड येथील पत्रकार देवेंद्र ढाका यांच्या यश नामक २२ वर्षीय तरुण मुलाची बीड शहरात काही दिवसांपूर्वी दिवसाढवळ्या एका टोळक्याकडून निर्घृण हत्या करण्यात आली होती. आज माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी बीड शहरातील ढाका कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

स्वर्गीय यश ढाका या उमद्या तरुणाची बीड शहरातील गजबजलेल्या माने कॉम्प्लेक्स भागात दिवसाढवळ्या हत्या करण्यात आली होती. या प्रकरणाचे व्हिडीओ सुद्धा व्हायरल झाले होते. अल्पसंख्यांक मागासवर्गीय समाज असलेल्या वाल्मिकी समाजातील देवेंद्र ढाका व त्यांच्या परिवारावर यामुळे दुःखाचा डोंगर कोसळला असून, ढाका कुटुंबीय न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. स्वर्गीय यश



ढाका याच्या सर्व मारेकऱ्यांना कठोरात कठोर शिक्षा केली जावी यासाठी आपण वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांशी चर्चा केली असून, तुमच्या या लढाईत तुम्ही स्वतःला एकटे समजू नका, कुणालाही घाबरू नका, मी न्यायाच्या या लढाईत तुमच्या पूर्ण शक्तीने पाठीशी उभा आहे असे धनंजय मुंडे यांनी यश ढाका च्या आई वडिलांशी बोलताना म्हटले. यावेळी पत्रकार देवेंद्र ढाका व त्यांच्या कुटुंबीयांच्या भावना अनावर झाल्याचे पाहायला मिळाले.

दरम्यान या प्रकरणात पोलिसांकडून केल्या जात असलेल्या तपासाची धनंजय मुंडे यांनी पोलीस अधीक्षकांची चर्चा करून माहिती घेतली असून याबाबत आपण राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्याशी चर्चा करणार असून, यशच्या कुणाच्या कटात सहभागी असलेल्या कुणालाही सोडले जाणार नाही, असे धनंजय मुंडे म्हणाले, यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ओबीसी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे, ॲड. गोविंदराव फड, प्रदेश प्रवक्ते भागवत तावरे, अविनाश नाईकवाडे, विनोद हतांगळे, यांच्यासह ढाका कुटुंबीय व नातेवाईक आदी उपस्थित होते.



# बिंदुसरा नदीपात्रात पुन्हा कचरा!

## नगरपालिकेची स्वच्छता मोहीम म्हणजे नव्याचे नऊ दिवस

**बीड | प्रतिनिधी**

बीड शहराच्या मध्यातून वाहणारी बिंदुसरा नदी गेल्या ४० वर्षांनंतर पहिल्यांदाच यावर्षी नीट स्वच्छ करण्यात आली. लाखो रुपये खर्च करून प्रशासनाने राबवलेल्या या मोहिमेमुळे नदीचे सौंदर्य खुललेच नाही, तर नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीत आलेल्या पुरानेही शहराला कोणतीही मोठी हानी झाली नाही. याबद्दल बीडकरांनी त्या वेळी प्रशासनाचे मनापासून कौतुक केले होते.

मात्र हे कौतुक जास्त काळ टिकले नाही. आज पुन्हा नदीपात्रात कचऱ्याचे साम्राज्य पसरले असून प्रशासनाची बेफिकिरी उघड झाली आहे.

नदीपात्रात केलेली स्वच्छता मोहीम ही कायमस्वरूपी उपक्रम न ठरता नव्याचे नऊ दिवस ठरल्याचे वास्तव आता जनतेसमोर आहे. जेव्हा स्वच्छतेमुळे शहर वाचले, तेव्हा कौतुक झाले; पण सातत्य न राखल्याने प्रशासन पुन्हा जनतेच्या रोषाचा धनी ठरत आहे. ◀◀ पान २ वर

# माजलगाव येथील बालाजी मंदिरात ब्रह्मोत्सवास प्रारंभ

## व्यंकट रामन गोविंद नामाने माजलगाव शहर दणाणून गेले

**माजलगाव | प्रतिनिधी**

शहरातील बालाजी मंदिर येथे (ता. ४ ते ६ ऑक्टोबर) दरम्यान ब्रह्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. (ता. ४) शनिवारी शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या यात्रेत बाल वारकऱ्यांनी सादर केलेल्या नृत्याने लक्ष वेधले.

बालाजी मंदिर सेवा फाऊंडेशन, माजलगावच्या वतीने व्यंकटेश बालाजी श्री.सहस्त्र कलशाभिषेक विधी चे आयोजन करण्यात आले आहे. हवन विधी चे यजमान उज्वल शिवप्रसाद भुतडा हे असून श्री.गणपती पुजन, देवता स्थापन, अग्नी स्थापन, ग्रहयज्ञ व सहस्त्र




कलशासादन अर्चन इत्यादी पूजन होणार आहे. शनिवार झेंडा चौक ते शिवाजी महाराज चौक ते बालाजी मंदिर येथून शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत समाज बांधव व महिला भगिनीं, भाविक भक्त उपस्थित होत्या. चिमुकल्या वारकऱ्यांनी व बालाजी भगवानच्या पालखीने लक्ष वेधले होते. फुगडी खळेत भक्तांनी आनंद व्यक्त केला. (या.५) रविवार ब्रम्होत्सवा व श्री.सहस्त्र कलशाभिषेक विधी दुतीय दिवस १००० महिला द्वारे विष्णुसहस्त्रनाम व्यंकटेश स्तोत्र चे वाचन होईल. (ता.६)सोमवार महाआरती व ब्रम्होत्सव व श्री.सहस्त्र कलशाभिषेक विधी तृतीय दिवस १००० महिला च्या वतीने विष्णूसहस्त्रनाम व व्यंकटेश स्तोत्र चे वाचन कोजागिरी पौर्णिमा, त्रिशोपचार महापूजन, ध्वजारोहण, नैवेद्य, महाआरती श्री महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार आहे.महाप्रसादाचे यजमान रामस्वरूप खंडेलवाल व कारभारी काळे हे आहेत. याचा लाभ घ्यावा असे आवाहन बालाजी सेवा संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे

# सोशल फाउंडेशन कोल्हापूर यांच्या वतीने ७०० कीटचे वाटप

**तलवाडा | प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून अतिरुष्टी पाऊस झाला असून या पावसामुळे गोदावरी नदी काठी व सिंधफणा नदी काठी राहणाऱ्या लोकांचे घरात पाणी गेल्यामुळे तसेच शेतीच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

या लोकांना मदत करण्यासाठी डॉ.आप्पासाहेब उर्फ सारे पाटील सोशल फाउंडेशन आणि दत्त उद्योग समूहाचे सर्वेसर्वा उद्यान पंडित मा. गणपतराव पाटील दादा ता. शिरोळ,जि. कोल्हापूर यांच्या कडून गहू, तांदूळ, साखर, तेल,बिस्कीट,



कपड्याची साबण, अंगाची साबण, बिसलेरी पाणी बॉटल, गव्हाचा आटा, ब्रस, कोलगेट, तेल, चटई, कपडे अशा अनेक वस्तूची किट तयार करून ता .गेवराई जि. बीड येथील राजापुर येथे १६० किट, काठोडा येथे १०० किट, रामपुरी येथे १६० किट, मनुबाई जवळा येथे ६० श्रीपतअंतरवाला येथे ६० गोपत पिंपळगाव ◀◀ पान २ वर

## विवाहीतेशी गैरवर्तन करून एकावर चाकू हल्ला

**तलवाडा | प्रतिनिधी**

भावाला मारहाण करून त्याच्यासोबत वाद घालत घरातील विवाहितेशी गैरवर्तन केल्याचा प्रकार तलवाडा पोलीस ठाणे हद्दीतील मनुबाई जावळा येथे घडला. यावेळी पिडितेशी गैरवर्तन करणाऱ्या आरोपीने पिडित विवाहितेच्या वडिलांवर चाकू हल्ला केला. यामध्ये पिडितेचे वडिल जखमी झाले असून या प्रकरणी अंकुश मंडलिक याच्याविरूध्द तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पिडितेने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि.१ ऑक्टोबर रोजी आम्ही ◀◀ पान २ वर

# आष्टीच्या सार्थक धोंडेला सुवर्णपदक तर सार्थक कावदारला रजत पदक

**आष्टी | प्रतिनिधी**

सिलंबम असोसिएशन महाराष्ट्र यांचे वतीने पुणे येथे घेणेत आलेल्या २२ व्या राज्य स्तर स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातुन ७०० खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता.

यामध्ये आष्टीचा सार्थक धोंडे याला सुवर्णपदक मिळाले आहे तसेच सार्थक कावदार याला रजत पदक मिळाले आहे, हे दोन्ही विद्यार्थी आष्टी येथील रहिवासी असून सध्या छत्रपती शिवाजी विद्यानिकेतन व ज्युनिअर कॉलेज पेठ वडगाव कोल्हापूर या ठिकाणी शिक्षण घेत आहेत तरी या दोन्ही खेळाडूंचे सर्व स्तरांमधून कौतुक केले जात आहेत या स्पर्धेसाठी प्राध्यापक लहू हिंगणे श्री संजय धोंडे श्री सतीश कावदार, अमोल धोंडे





सर गोरे सर वाल्मीक तात्या वांढरे या सर्वांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यशस्वी खेळाडूंना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री राजेंद्र माने सर सचिवा सौ सुवर्ण मॅडम खजानिस बापुसो माने, मिलिटरी इंस्ट्रक्टर श्री. राजेंद्र पाटील सर कॅप्टन श्री .सुरेश आडसुळ सर ,प्रशालेचे व्यवस्थापक व जिमखाना प्रमुख आनंद पाटील सर, प्रशिक्षक श्री. बाळासो पाटील सर, यांचे मार्गदर्शन लाभले तसेच सर्व विभाग प्रमुख ,शिक्षक ,शिक्षेकेत्तर कर्मचारी याचे सहकार्य लाभले.

# आंतरराष्ट्रीय मास्टर्स स्पर्धेसाठी डॉ.संतोष कदम यांची निवड

**अंबाजोगाई प्रतिनिधी**

दुबईत होणाऱ्या ४५ वर्षांवरील व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी भारतीय संघात दुबई मुहसिंहा येथील इनडोअर स्टेडियम मध्ये १८ ते २३ ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या आंतरराष्ट्रीय मास्टर्स व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी अंबाजोगाई येथील योगेश्वरी क्रीडा मंडळाचे खेळाडू डॉ.संतोष कदम यांची भारतीय संघात निवड झाली आहे.

दुबई येथे होणाऱ्या या मास्टर्स आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी भारतासह स्पेन,पोलंड, युयेई, पाकिस्तान,



फिलिपाईन्स, नेपाळ व युरोपियन युनियन संघाचा समावेश असणार आहे.पुणे येथे झालेल्या मास्टर्स व्हॉलीबॉल ◀◀ पान २ वर

# आष्टीत मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट,नागरिकांना त्रास

**आष्टी | प्रतिनिधी**

गेल्या दोन महिन्यांपासून शहरात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट असून,या कुत्र्यांचा नागरिकांना त्रास होत आहे.तरि नगर पंचायतने या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

आष्टी शहरात गेल्या दोन महिन्यांपासून मोकाट जनावर व कुत्र्यांचा सुळसुळाट असुन, यासंदर्भात आष्टीकरांनी नगर पंचायत मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले.दिलेल्या



निवेदनात म्हटले आहे की,मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे.व्यापारपेठेतच शनिचौक,छत्रपती शिवाजी महाराज चौक,माहत्मा फुले चौक,बसस्थानक परिसर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, कमानवेस,अग्निचौक,माळीवाडा,भाजी मंडई,गोंधळ गल्ली,सायकड गल्ली,दारू गल्ली,आझाद नगर,मोगलपुरा,भिमनगर या भागात मोकाट कुत्र्यांनी धुमाकूळ घातला आहे.त्यामुळे नागरिकांत भीतीचे वातावरण आहे.यासंदर्भात लक्ष ◀◀ पान २ वर

# अपहरण करून अल्पवयीन मुलीवर अत्याचार, पाच जणांवर गुन्हा दाखल

**आष्टी | प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील आष्टी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावातून १४ वर्षीय अल्पवयीन मुलीला बळजबरीने चार चाकी वाहनातून उचलून तिच्यावर अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे .या गंभीर प्रकरणी आष्टी पोलिसात मंगळवारी पाच जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

आहे. २५ सप्टेंबर रोजी मुख्य आरोपीने मित्रांच्या मदतीने या अल्पवयीन

अपहरण करून मुलीला तिच्या गावातून जबरदस्तीने चारचाकी वाहनातून प्रथम खडकत येथे नेले. त्यानंतर तिला पनवेल येथे नेऊन तिच्यावर अत्याचार करण्यात आला. अत्याचारानंतर २७सप्टेंबर रोजी आरोपींनी मुलीला तिच्या गावात आणून सोडले. मुलीने घडलेला प्रसंग आई-वडिलांना सांगितल्यानंतर त्यांनी २९ सप्टेंबर रोजी आष्टी पोलिसात धाव घेऊन तक्रार दाखल केली. या प्रकरणी अत्याचार करणारा मुख्य आरोपी पवन पोठरे (वय २४, रा. डोणगाव, ता. जामखेड, जि. अ.नगर) याच्यासह त्याच्या चार साथीदारांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी मुख्य आरोपी पवन पोठरे याला अटक केली असून, पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक एन. बी. सूर्यवंशी, अंमलदार सचिन पवळ हे करीत असल्याचे पोलीसांकडून सांगण्यात.

# आ.सुरेश धस यांच्या पाठपुराव्याला यश

## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत दोन नवीन ५ MVA ट्रान्सफॉर्मर मंजूर

**आष्टी | प्रतिनिधी**

आष्टी विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना सौर ऊर्जेद्वारे सातत्यपूर्ण आणि शाश्वत वीजपुरवठा मिळावा, या उद्देशाने आमदार सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले असून मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत दोन प्रमुख उपकेंद्रांवर ५ चत- क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर मंजूर करण्यात आले आहेत.शेतकरी व नागरिकांतून आनंद उत्सव साजरा करत राज्य सरकार व आ.सुरेश धस यांचे आभार मानले.

या मंजुरीनंतर रोहतवाडी ३३ के. व्ही. उपकेंद्र, रोहतवाडी आणि ३३ के. व्ही. उपकेंद्र, डोंगरकिन्ही येथे कामे मोठ्या वेगाने सुरू झाली आहे.या कामांमुळे शेतकऱ्यांना दिवसाच्या वेळेत सौर ऊर्जेद्वारे शेती सिंचनासाठी स्थिर, विश्वासार्ह आणि शाश्वत वीजपुरवठा उपलब्ध होणार आहे. यामुळे शेती उत्पादनात वाढ, ऊर्जा बचत आणि पर्यावरणपूरक विकासाला चालना मिळेल. या यशाबद्दल बोलताना आमदार सुरेश धस यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या अडचणींचे निराकरण आणि ऊर्जेच्या स्थिर पुरवठ्यासाठी मी नेहमीच प्रयत्नशील आहे. या दोन उपकेंद्रांच्या मंजुरीमुळे मतदारसंघातील अनेक गावांना दीर्घकालीन लाभ होणार असून हे काम म्हणजे शेतकऱ्यांसाठी मिळवलेले एक ठोस यश आहे. रोहतवाडी उपकेंद्रांतर्गत नायगाव, रोहतवाडी, जवळला,थेरला, करंजवन, डोंमरी, कोल्हेमानेवस्ती,भुसारनारवाडी, तिरमलावाडी, भगताचे कोठे,घाटेवाडी, वडझरी,हनुमानवाडी, मळफाचीवाडी,पिठ्ठी, उखांडा या गावांचा समावेश आहे, तर डोंगरकिन्ही उपकेंद्रांतर्गत डोंगरकिन्ही, नाळवंडी, जाटनांदूर, मळेकरवाडी, मांडवेवाडी, तुपेवाडी, मुंजारवस्ती, मिसाळवाडी,मोरजळवाडी, भाटेवाडी, कारेगाव, पोटेवाडी, भराटवाडी, जाधववाडी, घोळेवाडी,सवसवाडी,मदमापुरी आणि जेबेवाडी ही गावांना फायदा होणार होणार आहे.या योजनेच्या माध्यमातून आष्टी विधानसभा मतदारसंघात सौर ऊर्जेवर आधारित कृषी क्रांती घडविण्याकडे एक महत्त्वाचे पाऊल उचलले गेल्याचे शेतकरी व स्थानिक नागरिकांकडून भावना व्यक्त होत आ.सुरेश धस यांचे आभार मानले जात आहे.

# नाम फाऊंडेशनची शेतकऱ्यांच्या व्यथांवर फुंकर

## नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे यांची मदत पोहचली शेतकर्यांपर्यंत



**बीड | प्रतिनिधी**

सर्वच शेतकर्यांसह सिरसमार्ग पट्ट्यातील शेतकर्यांच्या व्यथा पाहून अभिनेते नाना पाटेकर व मकरंद अनासपुरे व्यथीत झाले होते. शेतकर्यांनी संकटात खचून जाऊ नये, महाराष्ट्र आपल्या पाठीशी आहे, असा धीरही त्यांनी दिला होता. पूरग्रस्त शेतकर्यांना शुक्रवारी नाम फाऊंडेशनच्या वतीने किराणा कीट वाटप करत शेतकर्यांच्या ◀◀ पान २ वर

# स्व.काकूंचे जीवन परोपकारासाठीच - रामायणाचार्य रामराव ढोक महाराज

## आम्ही स्व.काकूंचे वारसदार असल्याचा अभिमान वाटतो - माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**बीड | प्रतिनिधी**

जिल्ह्यातील आदराचे स्थान म्हणून स्व.काकूंकडे पाहिले जाते त्यांना अभिवादन करण्यासाठी एवढा मोठा चाहता वर्ग उपस्थित राहतो हेच काकूंच्या कार्याची पावती आहे. अशा लोकनेत्या स्व.काकूंचा कधीही विसर पडू नये असे प्रतिपादन रामायणाचार्य ह.भ.प. ढोक महाराज यांनी केले तर स्व.काकूंचे आम्ही वारसदार असल्याचा अभिमान वाटतो,






काकूंसारख्या कर्तबगार महिलेने शून्यातून विश्व निर्माण केल्याची प्रेरणा घेण्यासारखी असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

शनिवार दिनांक ४ ऑक्टोबर रोजी माजी खासदार स्व.केशरकाकू सोनाजीराव क्षीरसागर यांच्या १९ व्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याचवेळी प्रसिद्ध कीर्तनकार रामायणाचार्य रामराव ढोक महाराज यांच्या कीर्तनाचेही आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम क्षीरसागर कुटुंबीयांच्या वतीने काकूंना अभिवादन करण्यात आले त्यानंतर भरगच्च भरलेल्या मैदानात कीर्तनाला प्रारंभ झाला. यावेळी किर्तन सांगताना रामायणाचार्य ढोक महाराज म्हणाले की, माय गेली बाप गेला आता सांभाळी विठ्ठला या संत जनाबाईंचा अभंग घेत ◀◀ पान २ वर

# जाहिरात न देणाऱ्या नेत्यांच्या बातम्या छापू नयेत-संपादक संघाचा निर्णय

**बीड | प्रतिनिधी**

वृत्तपत्रांना जाहिराती न देणाऱ्या नेत्यांच्या कार्यकर्त्यांच्या बातम्या छापण्यात येवू नयेत असे बीडमधील मराठी वृत्तपत्रांच्या संपादकांनी आपसात विचार विनिमय करून निर्णय घेतला आहे. सर्व संपादकांनी सदर निर्णयाचे काटेकोरपणे अंमलबजावणी करावी असे आवाहन संपादक संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील सर्व मराठी वृत्तपत्रे सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्याच्या सर्व कार्यकर्त्यांच्या मोठमोठ्या बातम्या छापल्या जातात. अनेक नेत्यांना प्रसिद्धी देवून वृत्तपत्रांनी मोठे केले आहे. त्यांना आमदार, खासदार, मंत्री करण्यात वृत्तपत्रांचा मोठा वाटा आहे. अगदी ग्रामपंचायत, पंचायत समित्या, जिल्हा परिषद, नगर पालिका आदी कार्यकर्त्यांच्या पाठीशी वृत्तपत्रे उभी राहिली आहेत. परंतु हीच नेते मंडळी व कार्यकर्ते वृत्तपत्रांना जाहिराती देत नाहीत, जाहिराती देण्यासाठी आपला हात आखडता घेतात. मात्र निवडणुकीमध्ये कोट्यावधी रूपयांची उधळपट्टी करतात. अगदी गल्ली बोळात निवडणुक काळात हीच मंडळी लाखो रूपये रेवड्या-फुटाणे वाटावेत तसे वाटतात. परंतु त्यांना मोठे करणाऱ्या वृत्तपत्रांकडे कानाडोळा करतात. वृत्तपत्राचा वर्धापन दिन असेल, दीपावली अंक असेल अथवा नेत्यांचे वाढदिवस असतील जाहिराती देण्याचे टाळतात. काही नेते जाहिराती देतात बिले देत नाहीत. तर दुसरीकडे लावणी ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

रविवार, दि.०५ ऑक्टोबर २०२५ । पान ७

# मराठवाड्यातील लाडक्या बहिणींना सहा महिन्यांचे हफ्ते एकत्र द्या ; उद्धव ठाकरेंची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील शेतकऱ्यांना आता मदतीची गरज आहे, पण केंद्र सरकार त्यावर काहीही करत नाही. आता स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका जवळ आल्याने मोदी येतील आणि काहीतरी थातूरमातूर घोषणा करतील. बिहारमध्ये निवडणुका असल्याने मोदींनी तिथल्या महिलाच्या खात्यात १० हजार रुपये दिले. आता मराठवाड्यातील लाडक्या बहिणींना एकत्रितपण सहा हफ्ते मदत म्हणून द्यावी असं आवाहन उद्धव ठाकरेंनी केलं. पुण्यातील कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात उद्धव ठाकरे बोलत होते.




लाडक्या बहिणींना सहा हफ्ते एकत्र द्या

मराठवाड्यात पूरस्थिती गंभीर आहे, त्या ठिकाणच्या शेतकऱ्यांना, लोकांना मदतीची गरज आहे असं उद्धव ठाकरे म्हणाले. ते म्हणाले की, सत्ता असो किंवा नसो, आम्ही तुमच्या मदतीसाठी आहे. ज्या परिस्थिती मराठवाड्यातील शेतकरी संपत आहे, त्या वेळी त्यांना मदत करणे आवश्यक आहे. विधानसभेच्या आधी लाडकी बहीण लाभार्थ्यांच्या खात्यात दोन-तीन महिन्यांचे हफ्ते देण्यात आले. मग आता सहा महिन्यांचे हफ्त एकत्र द्या, आता पूरस्थितीमध्ये लाडक्या बहिणींना गरज आहे.बिहारच्या महिलांच्या खात्यात मोदींनी १० हजार रुपये टाकले. त्या ठिकाणी निवडणुका आहेत म्हणून त्यांनी हे केलं. मग महाराष्ट्राला मदत का केली जात नाही असा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला.

वसंत मोरे लोकांना आपले वाटतात

ज्या ठिकाणी गरज असेल त्या ठिकाणी शिवसैनिकांनी मदत करावी, सर्वसामान्यांच्या मदतीसाठी धावून जावं असं आवाहन उद्धव ठाकरे यांनी केलं. यावेळी उद्धव ठाकरे यांनी पुण्यातील नेते वसंत मोरे यांचे कौतुक केलं. ज्या ठिकाणी अन्याय होत होता त्या ठिकाणी वसंत तात्या हातात बांबू घेऊन जायचे आणि न्याय मिळवून द्यायचे. मुख्यमंत्री आला तरी नको, पण वसंत मोरे आले तर लोकांना आपलेपणा वाटायचा. त्यांना न्याय मिळण्याची शाश्वती वाटायची अशा शब्दात उद्धव ठाकरेंनी वसंत मोरेंचे कौतुक केलं.

### उद्योगपतींची कर्जे माफ पण...

उद्धव ठाकरे म्हणाले की, या देशातील उद्योगपतींनी हजारो कोटींचं कर्ज काढलं, नंतर ते फेडलं नाही आणि ते पळून गेले. नंतर या उद्योगपतीचे कोट्यवधी रुपयांचे कर्ज माफ करण्यात आलं. पण शेतकरी कधीच कर्ज काढून पळून जात नाही. ज्यावेळी आपण काढलेलं कर्ज फेडू शकत नाही असं वाटतं त्यावेळी तो आत्महत्या करतो. अशा शेतकऱ्यांचे कर्ज मात्र माफ केलं जात नाही.

# दिवाळीनंतर दोनच दिवसांत आचारसंहिता लागू होणार? चंद्रकांत पाटलांनी सांगितला आयोगाचा प्लॅन

पुणे : उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत मोठा दावा केला आहे. ते म्हणाले, लोकसभा आणि विधानसभेपेक्षा ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि महानगरपालिका निवडणुका या खऱ्या अर्थाने नेत्याची कसोटी पाहणाऱ्या असतात. लोकशाहीतील या निवडणुका सर्वात महत्त्वाच्या आहेत.



आज (४ ऑक्टोबर) भाजपच्या विजयी संकल्प मेळाव्यात बोलताना त्यांनी निवडणूक आयोगाचा संभाव्य प्लॅन उलगडला. ते म्हणाले, कदाचित आज संध्याकाळपर्यंत जिल्हा परिषद निवडणुकीची घोषणा होऊ शकते. माझ्या ४० वर्षांच्या अनुभवावरून सांगतो, दिवाळीनंतर दोनच दिवसांत आचारसंहिता लागू होईल. त्यामुळे आता निवडणुकीच्या तयारीला लागा.

महायुतीच्या एकजुटीने लढणार निवडणूक

चंद्रकांत पाटील यांनी कार्यकर्त्यांना उद्देशून सांगितले की, निवडणूक ही फास्ट ट्रेनसारखी आहे, प्लॅटफॉर्मवर जो उभा राहील, तो मागे राहील. पण नाराज होऊ नका, राजकारणात प्रयत्न आणि नशीब दोन्ही महत्त्वाचे असतात. २०१९ मध्ये ज्यांचे तिकीट नाकारले गेले, त्यापैकी बावनकुळे यांना २०२४ च्या विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवार ठरवण्याची जबाबदारी मिळाली, याचा दाखला देत त्यांनी कार्यकर्त्यांना प्रोत्साहन दिले.

ते पुढे म्हणाले, महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात मोठा फरक दिसला पाहिजे. २०१७ ची परिस्थिती बदला. यंदाच्या दिवाळीचा फायदा घ्या, लोकांशी संपर्क वाढवा. महायुतीच्या बॅनरखाली निवडणूक लढवली जाईल, पण अंतिम निर्णय वरिष्ठ नेते घेतील, असंही चंद्रकांत पाटील यांनी यावेळी स्पष्ट केले. आमच्या कार्यकर्त्यांवर अन्याय होऊ देणार नाही. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना ज्या जागा मागत आहेत, तिथे आपला उमेदवार सक्षम असेल तर मैत्रीपूर्ण लढत होईल, पण कार्यकर्त्यांचा बळी जाणार नाही, असं आश्वासन चंद्रकांत पाटील यांनी यावेळी दिले.

# अजित पवारांच्या वाढत्या दौऱ्यांनी भाजप, सेना घायाळ

पिंपरी : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत्या काही महिन्यांमध्ये होऊ घातल्या आहेत. एकेकाळी राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेला पिंपरी चिंचवड महापालिकेचा गड ताब्यात घेण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कंबर कसली आहे. विधानसभा क्षेत्रानुसार जनसंवाद अन महापालिका अधिकार्यांसोबत बैठकांचे सत्र सुरू झाले आहे. अजित पवारांच्या या रणनितीमुळे महायुतीमध्ये एकत्र असलेल्या भाजप आणि शिंदेसेनेचे पदाधिकारी मात्र घायाळ झाले आहेत.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभागरचना करून ती राज्यशासनाला पाठवण्यात आली आहे. येत्या ६ ऑक्टोबरला अंतिम प्रभागरचना आयोगाकडून प्रसिद्ध करण्यात येणार आहे. तसेच मतदार याद्या फोडण्याचे देखील काम अवघ्या दोन ते तीन दिवसांत सुरू होणार आहे. निवडणुकीची हालचाल पाहता सर्वच पक्षांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. महापालिका एकत्र लढायची की स्वबळावर याबाबत अद्याप महायुती आणि महाविकास आघाडीच्या वरिष्ठ नेत्यांनी निर्णय घेतला नाही. असे असले तरी महायुतीमधील भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाने स्वबळावर लढण्यासाठी शड्डू ठोकला आहे.

त्यातही अजित पवार यांनी स्वतः लक्ष घालत शहर पुन्हा ताब्यात घेण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. ९० च्या



दशकामध्ये खासदार झाल्यानंतर अजित पवार यांनी पिंपरी चिंचवड शहरामध्ये विशेष लक्ष घातले. पुढे राज्यात देखील नेतृत्व करत असताना पिंपरी चिंचवड महापालिकेसाठी शहरातील गावकी-भावकी एकत्र करत राष्ट्रवादीचा झेंडा महापालिकेवर कायम फडकवला. सन २०१४ ला मोदी लाटेत अजितदादांच्या खंद्या समर्थकांनी साथ सोडत कमळ हाती घेतले. राज्यात झालेले सत्तांतर पाहून पुढे एक-एक करत राष्ट्रवादीच्या पदाधिकार्यांनी हातावरील घड्याळ अलगद बाजूला ठेवत कमळाची साथ दिली. त्याचाच परिणाम २०१७ च्या महापालिका निवडणुकीत झाला. सन २०१२ ला अवघे तीन नगरसेवक निवडून आलेल्या भाजपने २०१७ मध्ये थेट ७७ चा आकडा गाठत महापालिकेवर एकहाती सत्ता मिळवली. त्यामुळे अजितदादांच्या बालेकिल्ल्याला सुरुंग लागला.आता हाच बालेकिल्ला पुन्हा ताब्यात घेण्यासाठी अजित पवार यांनी रणनिती आखली आहे. सुरूवातीला विधानसभेच्या तोंडावर पक्षाची झालेली पडझड त्यांनी योग्यरित्या सावरत पक्ष सोडलेल्यांना पुन्हा पक्षात घेतले आहे. तर जसजशी निवडणूक जवळ येत आहे, तसतसे पवार यांनी जनतेच्या दरबारात जात त्यांच्या समस्यांना वाचा फोडण्याचे काम सुरू केले आहे. त्याचाच परिपाक गेल्या आठवड्यात पिंपरीत झालेल्या जनसंवादमध्ये दिसून आला.त्या जनसंवादचे मायलेज कमी होते ना होते तेच त्यांनी सोमवारी (दि. २९) भल्या पहाटे (सकाळी सात वाजता) महापालिकेत येत अधिकार्यांना फैलावर घेतले. पुन्हा याच आठवड्यात चिंचवडमध्ये जनसंवाद घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे अजितदादांच्या या दौऱ्यांनी महायुतीमध्ये असलेल्या भाजप आणि शिंदेसेनेच्या पदाधिकार्यांची चांगलीच गोची झाली आहे. अजित पवार यांच्या या पेरणीचे महापालिका निवडणुकीत पीक कसे येते हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# शिरूर शहरापासून कोंढणओढ्यापर्यंत रस्त्यावर खड्डेच खडे; नागरिक त्रस्त, सार्वजनिक बांधकाम विभाग निद्रीस्त



शिरूर : शिरूर शहराच्या हद्दीपासून कोंढण ओढ्यापर्यंत जाणाऱ्या मुख्य रस्त्याची अवस्था अक्षरशः खड्डेमय झाली आहे. शेकडो खड्ड्यांमुळे वाहनधारकांचे प्रचंड हाल होत असून, काही ठिकाणी रस्ता फाटला आहे. तरीसुद्धा सार्वजनिक बांधकाम विभाग आणि संबंधित अधिकारी मात्र या सर्व परिस्थितीकडे डोळे झाक करून निद्रिस्त अवस्थेत असल्याचे चित्र दिसत आहे.

शिरूर सहाय्यक अभियंता, हे कार्यालयात भेटतच नसून ते कायम तालुक्याबाहेरच असतात. त्यामुळे त्यांचे या रस्त्यांकडे दुर्लक्ष होत आहे. त्यांना हे रस्ते दिसत नाही का असा सवाल उपस्थित होत आहे. सामाजिक कार्यकर्ते निलेश वाळुंज यांनी अनेक वेळा या रस्त्यावरील खड्ड्यांविषयी लेखी आणि तोंडी तक्रारी करूनही अद्याप पर्यंत कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही.

उलट दिवसेंदिवस रस्त्याची अवस्था अधिकच बिकट होत चालली आहे. पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने वाहनचालकांना धोका निर्माण झाला असून, अपघातांची संख्या झपाट्याने वाढत आहे. त्यातच अनेक ठिकाणी शास्त्रीय पद्धतीने गतिरोधक (स्पीड ब्रेकर) न बसवल्याने दोन चाकी वाहनचालक आणि शालेय बसचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

नागरिकांचा उद्रेक वाढत असून, करोडो रुपयांचा निधी कुठे जातो? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. दररोज या रस्त्यावरून तालुक्याच्या ठिकाणी शेकडो विद्यार्थी, कामगार, शेतकरी, नागरीक आपल्या विविध कामांसाठी प्रवास करतात. पण रस्ता खड्ड्यांनी भरल्याने जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. जर तातडीने दुरुस्ती केली नाही, तर आम्ही रस्त्यावर उतरून आंदोलन करू, अशी चेतावणी नागरिकांनी दिली आहे.सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे शिरूर-कोंढण ओढा मार्ग 'खड्ड्यांचा महामार्ग' बनला आहे. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ लक्ष घालून रस्त्याचे डांबरीकरण आणि सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी सर्वसामान्य नागरिकांची जोरदार मागणी आहे.

# गौतमी पाटीलवर कारवाई करता येणार नाही; मंत्री चंद्रकांत पाटलांच्या फोननंतर पोलीस उपायुक्तांनी सांगितलं कारण

**पुणे । प्रतिनिधी**

शहरातील वडगाव बुद्रुक परिसरातील एका रिक्षाला कारने धडकेत रिक्षाचालक गंभीर जखमी झाल्याने त्यांनी थेट कोथरुडचे (झींपिश) आमदार आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांची भेट घेऊन कारवाईची मागणी केली होती. विशेष म्हणजे ज्या कारने रिक्षाला धडक दिली ती कार नृत्यांगणा गौतमी पाटील हिच्या नावावर असल्याने पोलिसांनी गौतमी पाटीला या अपघातप्रकरणी नोटीस बजावली आहे. या अपघातात रिक्षाचालक गंभीर जखमी असून सामाजी विठ्ठल मरगळे असे त्याचे नाव आहे. तर दुसरीकडे याच मुद्द्यावर कोथरूडचे आमदार असलेल्या चंद्रकांत पाटील (उहरपवीरज्ञरपीं झरींळश्र उरश्रश्र ीं ऊझ) यांनी थेट डीसीपी संभाजी कदम यांना फोन लावत दोषींवर कडक कारवाई करण्याची निर्देश दिले आहेत. आता, पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांनी गौतमी पाटीलवर कुठलाही कारवाई करता येणार नसल्याचे म्हटले. त्यासाठी, त्यांनी कायदेशीर बाजूही सांगितली.

गौतमी पाटील हिच्या गाडीने झालेल्या अपघात प्रकरणात रिक्षा चालकांच्या



कुटुंबीयांनी केलेले आरोप पुणे पोलिसांनी फेटाळले आहेत. अपघातावेळी गौतमी पाटील या गाडीत होती की नाही याचा तपास सुरू आहे, पण चालकावर कारवाई केली आहे, अशी माहिती पुणे पोलिसांनी दिली. कायद्यानुसार अपघातात को-पॅसेंजरवर कारवाई केली जात नसल्याचं पोलिसांचं म्हणणं आहे. त्यामुळे, गौतमी पाटीलवर कोणतीही कारवाई करता येणार नाही. गौतमी पाटील हिने गाडीचे संपूर्ण कागदपत्र पोलिसांकडे सादर केले आहेत. तसेच, गरज भासल्यास गौतमी पाटीलला चौकशीसाठी बोलवलं जाईल. मात्र, गौतमीला सध्या तरी चौकशीसाठी बोलवण्यात आलेलं नाही. गौतमी पाटील गाडीत होती की नाही याबाबतचं कोणतंही स्पष्टीकरण अजून समोर आलेले नाही. संपूर्ण प्रकरणाचा तपास पारदर्शकपणे सुरू असल्याचे पुणे पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांनी बोलताना सांगितले.

पुण्यातील मुंबई-बंगळूरू राष्ट्रीय महामार्गावरील वडगाव पुलाजवळ ३० सप्टेंबर रोजी एका हॉटेलसमोर एक रिक्षा उभी होती. त्यात रिक्षाचालकासह दोन प्रवासी होते. मागून आलेल्या गौतमी पाटीलच्या भरधाव कारनं उभ्या असलेल्या रिक्षाला पाठीमागून जोरदार धडक दिली. ही धडक इतकी जबर होती की, यामध्ये रिक्षाचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं. या अपघातात रिक्षाचालकासोबतच रिक्षातील दोन प्रवासीही गंभीर जखमी झाले. पोलिसांना अपघाताबाबत माहिती मिळताच तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान, अपघातानंतर कारचालक फरार झाला होता. मात्र, सीसीटीव्ही फुटेज तपासून पोलिसांनी ३० वर्षीय वाहन चालकाला अटक केली आहे.

गौतमी पाटीलवर अपघातग्रस्तांचा आरोप

गौतमी पाटील हिच्या कार चालकाची चूक असताना हा अपघात झाला. मात्र या संपूर्ण प्रकरणाची गौतमी पाटीलच्या टीमकडून दखल घेण्यात आली नाही. तसेच पोलिसांकडून सीसीटीव्ही उपलब्ध होत नाही, पोलीस योग्य ते सहकार्य करत नाहीत असा आरोप आता रिक्षाचालक मरगळे यांच्या कुटुंबीयांनी केलाय.


# ७० किलो चांदीची चोरी, आरोपीला उत्तर प्रदेशातून केली अटक

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील गुरूवार पेठेतील तब्बल ४० वर्षे जुन्या असलेल्या सराफी पेढीवर चोरट्यांनी डल्ला मारुन तब्बल ७० किलो चांदीचे दागिने चोरी केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी पुण्यातील खडक पोलिसांनी एकाला उत्तर प्रदेशातून बेड्या ठोकल्या आहेत. त्याच्याकडून ३६ किलो ४४२ ग्रॅम चांदी जप्त केली आहे. चोरी केलेली चांदी त्याने उत्तर प्रदेशातील त्याच्या घरी नेली होती.

चोरट्यांनी तीन पोती भरून ६७ लाख ६० हजार रुपये किमतीची ७० किलोहून अधिक दागिन्यांची चोरी केली

गुन्ह्यातील इतर आरोपींचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. राजेश महाराणीदिन सरोज (३६, रा. माघी चैनगड, थाना महेशगंज, ता. कुंडाख जि. प्रतापगड, उत्तरप्रदेश) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. १४ सप्टेंबर व १५ सप्टेंबर रोजी मध्यरात्री चोरट्यांनी तीन पोती भरून ६७ लाख ६० हजार रुपये किमतीची ७० किलोहून अधिक दागिन्यांची चोरी केली. यात ६२ लाखांची चांदी तर ५ लाखांच्या रोकडचा समावेश होता. या चांदीनी



भरलेली पोती (सिमेंटच्या गोणीच्या आकाराची) वाहून नेतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. तेव्हापासून पोलिस आरोपींच्या मागावर होते. घटनास्थळ व आजूबाजूच्या परिसरातील वेगवेगळ्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासून तांत्रिक तपास करण्यात आला. यातील संशयित आरोपींनी गुन्हा केल्यानंतर पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी कपडे बदलून पुणे रेल्वे स्टेशन येथून रेल्वेने उत्तर प्रदेश येथे गेले असल्याचे दिसून आले. अजून काही आरोपींचा शोध खडक पोलीस करत आहेत.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना ६२ कोटींचा दिवाळी बोनस

पिंपरी : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना तब्बल ६२ कोटी रुपयांचे बक्षीस रक्कम मिळणार आहे. महापालिकेच्या प्रथा व परंपरेनुसार दिवाळी बोनस म्हणून तब्बल साडेसहा हजार अधिकारी व कर्मचाऱ्यांना ८.३३ टक्के सानुग्रह अनुदान व जादा २० हजार रुपये दिले जाणार आहेत. त्यामुळे महापालिकेच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांची दिवाळी अधिक गोड होणार आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका कर्मचारी महासंघ व महापालिका आयुक्तांसोबत झालेल्या करारनामानुसार हा दिवाळी बोनस दरवर्षी दिला जातो. त्याबाबत महासंघ व महापालिकेत दर पाच वर्षांसाठी करारनामा केला जातो. मागील सन २०२१ पासून हा करारनामा झाला आहे. त्यानुसार, यंदाही हा बोनस दिला जाणार आहे. महापालिकेच्या वर्ग एक ते चारमधील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना बोनसचा लाभ मिळणार आहे.


अधिकारी व कर्मचाऱ्यांना ८.३३ टक्के सानुग्राह अनुदान व जादा २० हजार रूपये जादा असा बोनस दिला जाणार आहे. बोनस देण्याची मागणी कर्मचारी महासंघाने ८ जुलैला केली होती. महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाने ३० सप्टेंबरला त्या प्रस्तावाला मान्यता दिली. त्यावर आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी शुक्रवारी (दि.३) शिक्कामोर्तब केले. त्यामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांची दिवाळीचा धडाक्यात होणार आहे.

महापालिकेच्या सर्व विभागांचे अधिकारी व कर्मचाऱ्यांना बोनसचा लाभ मिळणार आहे. मात्र, सहा महिन्यांपेक्षा कमी सेवा झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना बोनसचा लाभ मिळणार नाही. बालवाडी शिक्षक, मानधनावरील अधिकारी व कर्मचारी, वैद्यकीय अधिकारी, समूह संघटक, तासिका तत्त्वावर नेमलेले कर्मचारी, महापालिका आस्थापनेवर करार पद्धतीने मानधनावर नेमलेले कर्मचारी, शासनाकडून पगारापोटी अनुदान मिळणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना बोनसचा लाभ मिळेल.

महापालिकेचे निलंबित अधिकारी व कर्मचारी, सन २०२४-२५ वर्षात सेवानिवृत्त, मयत किंवा स्वेच्छानिवृत्ती घेतलेले, राजीनामा दिलेले, सेवेतून कमी केलेले, सेवा समाप्त केलेले कर्मचारी, यांचा सेवाकाल विचारात घेऊन बोनस देण्यात येणार आहे.महापालिकेच्या सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात बोनससंदर्भात रक्कमेची तरतूद करण्यात आली आहे. ती रक्कम कमी पडत असल्यास तरतूद वर्गीकरण करावे. हा बोनस दिवाळीपूर्वी अदा करण्याबाबत कार्यवाही पूर्ण करावी, असे आदेश आयुक्तांनी लेखा विभागास दिले आहेत.दरम्यान, बोनससंदर्भात भविष्यात आक्षेप निर्माण झाल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून ती रक्कम वसूल केली जाणार आहे, असे आयुक्तांनी आदेशात नमूद केले आहे.

# अतिवृष्टीची मदत २,५०० रुपये जमा ; शेतकऱ्याने मोबाईलमधील मेसेज दाखवा ; बळीराजाचा संताप, हेक्टरी ५०,००० द्या

पुणे : राज्यात गेल्या १५ दिवसांपूर्वी झालेल्या पावसाने सर्वत्र पाणीच पाणी झाल्याचं पाहायला मिळालं. मराठवाड्यातील धाराशिव, लातूर, नांदेड, बीड, परभणी आणि सोलापूर जिल्ह्यात अनेक नद्यांना पूर आला होता. या पुराच्या पाण्यात शेतकऱ्यांची पिके पाण्यात गेली आहेत, तर काही ठिकाणी शेतातील मातीही वाहून गेली आहे. राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी पूरग्रस्त भागांचे दौरे केले. तत्पूर्वी सरकारने २२१५ कोटी रुपयांची मदतही जाहीर केली. मात्र, शेतकऱ्यांना ही मदत कुठपर्यंत पुरणार असा प्रश्न आहे. त्यातच, मे महिन्यात मिळालेल्या मदतीनंतर शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे. मे महिन्यात अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले.



इंदापूर तालुक्यातील सणसर गावच्या शेतकऱ्याचे पावणे दोन लाखांचे नुकसान झाले होते, पण सरकारकडून त्यांस केवळ २५५० रुपये मदत मिळाल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

शेतकऱ्याचे जवळपास पावणे दोन लाख रुपयांचे नुकसान झाल्यानंतर तब्बल अडीच हजार नुकसान भरपाई आल्याने शेतकरी आक्रमक झाला आहे. आता, हेच पैसे आम्ही कृषीमंत्र्यांना देणार असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. इंदापूर तालुक्यातील सणसर गावातील सुमित निंबाळकर यांना ही मदत आली असून इतर शेतकरी अद्यापही मदतीच्या प्रतीक्षेत आहेत. राज्यातील बुहतांश जिल्ह्यात यंदा अतिवृष्टी झाल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला असून आर्थिक संकटात सापडला आहे. आर्थिक संकटात सापडेल्या शेतकऱ्यांना आता सरकारकडून मदतीची अपेक्षा आहे. मात्र, मे महिन्यात झालेल्या अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात मदत मिळण्यास सुरुवात झाली असून मिळणारी मदत अत्यंत तोडकी असल्याने शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे. तसेच, हेक्टरी ५० हजार रुपये मदत देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. मे आणि सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झालं असून शेतकरी आक्रमक झाले आहेत. जर आम्हाला मदत करायची असेल तर भरीव स्वरूपाची करा, अन्यथा शेतकऱ्यांची थट्टा करू नका, अशी भावना संतप्त शेतकऱ्यांची आहे. जरी आम्हाला मदत आली तरी आम्ही ती मदत सरकारला परत देऊ, असा इशाराही शेतकऱ्यांनी दिलाय.